साहित्य

# मेघाणी

वसन्तराय जटाशंकर त्रिवेदी



भारतीय
साहित्याचे
निर्माते

MR
891.470 92
M 472 T
M472T

***मेघाणी*** (१८९७-१९४७) : राष्ट्रीय शाहीर म्हणून नाव कमावलेल्या श्री. झवेरचंद मेघाणी हे गांधी युगात भारताने जे महत्वाचे मानले आणि जे मिळवण्याचा संकल्प केला त्याला पाव शतकाहूनही अधिक काळ पर्यंत शब्दरूप देत राहिले.

कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि लोकसाहित्याचे संग्राहक व संपादक श्री. मेघाणी यांनी लेखनास प्रारंभ केला तो वृत्तपत्राद्वारे, त्यांच्या सर्वच साहित्यात दृष्टीची आणि कल्पनेची विशालता, स्पष्ट चित्रांकन करण्याचे त्यांचे सामर्थ्य व त्याहूनही अधिक, ज्या वादळांनी व दडपणांनी लोक त्रस्त झाले होते तेही आढळते. ते रूढीचे सर्व संकेत झुगारणारे समाजसुधारक होते. याचा निःसंदिग्ध पुरावा म्हणजे त्यांच्या कादंबऱ्या. परंतु लोकसाहित्य जमवून त्याचे संपादन करणे, तसेच त्यांना लोकांनी सांगितलेल्या कथा, आख्यायिकांच्या आधारे ते समृद्ध करणे हे त्यांचे सर्वात मोठे कार्य. लोकांच्या अंतःकरणाची अक्षरशः पकड घेणारी स्वतः रचलेली गाणी गाण्यासाठी लाभलेला सुरेल, बुलंद आवाज ही त्यात पडलेली भर. हे सगळे त्यांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी केले. त्यांनी पाहिले ते गायले व त्यांनी लोकांना जिंकले. मेघाणींना ओळखणाऱ्यांना व त्यांचे साहित्य वाचणारांना आज मेघाणी अद्वितीय, अतुलनीय राष्ट्रीय शाहीर म्हणून आठवतात.

या परिचय पुस्तकाचे लेखक श्री. वसंतराय जटाशंकर त्रिवेदी हे स्वतः प्रसिद्ध गुजराती लेखक आहेत. १९४१ पासून ते इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत. ते गुजरातमधील प्रमुख महाविद्यालयाचे, गुजरात कॉलेजच्या प्राचार्य पदावरून अलिकडेच निवृत्त झाले.

मुखपृष्ठ रचना : **सत्यजित रे**

रेखाचित्र : **चंद्रकांत रुद्र**

**किंमत** : SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 10.00

मे घा णी

भारतीय साहित्याचे निर्माते

# मे घा णी

लेखक

वसंतराय जटाशंकर त्रिवेदी

अनुवादिका

मृणालिनी देसाई

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली

*Meghani* ( मेघाणी ) : Marathi translation by Mrinalini Desai of English monograph by V. J. Trivedi.
Sahitya Akademi, New Delhi ( 1984 ).

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs 10.00

© Sahitya Akademi, New Delhi
First Edition 1984

*Publisher* :
**Sahitya Akademi**
Rabindra Bhavan
35, Ferozeshah Road
New Delhi–110 001

117027
9/12/84
SHIMLA
MR
891.470 92
M 472 T

*Regional Offices* :
172, M. M. G. S. Marg, Dadar, Bombay–400 014
29, Eldmas Road, Teynampet, Madras–600 018
Block V-B, Rabindra Sarobar Stadium Calcutta-700 029

*Printer* :
Satish Bhide
Shree Sanjay Mudranalaya
(Pro. Anuradha Publications Pvt. Ltd.)
Swastik House, 525, Senapati Bapat Marg
Dadar, Bombay 400 028.

किंमत SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs 10.00

Library IIAS, Shimla
MR 891.470 92 M 472 T
00117027

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| परिचय | १ |
| मेघाणींचे जीवन आणि कार्य | ३ |
| काव्य | ७ |
| कादंबऱ्या | ११ |
| लघुकथा | १७ |
| समीक्षा | २२ |
| पत्रकारित्व | २७ |
| लोकसाहित्य (संपादन व संशोधन) | ३० |
| लोकसाहित्य | ३५ |
| परिशिष्ट | ३९ |
| संदर्भ ग्रंथ-सूची | ५७ |

# परिचय

पांढरा शुभ्र फेटा आणि चुणीदार चोळणा घातलेली एक भारदस्त व्यक्ति राणपूर गावाच्या आसपास पुष्कळदा हिंडत असे. आणि काही वेळा ती पांढऱ्या शुभ्र भरदार दाढीच्या म्हाताऱ्यांच्या तसेच चपळ तरुणांच्या बरोबर गावाबाहेर चांदण्या रात्री झाडाखाली बसलेली दिसत असे. या भरदार, स्थूल व जड पावलाच्या व्यक्तीचा बुलंद, खडा व सुरेल आवाज ऐकणाऱ्याना मंत्रमुग्ध करी, व त्यांची मरगळ दूर करी. चलाख दृष्टीची, कुशाग्र बुद्धीची ही शुभ्र वेषधारी व्यक्ति पराक्रमाची व धैर्याची, प्रेमाची आणि संघर्षाची सामाजिक दुर्गुणांची व सद्गुणांची, प्राचीन काळच्या लढायांची, साधे, सच्चेपणाचे प्रामाणिक जीवन जगणाऱ्या स्त्रीपुरुषांचा समृद्ध वारसा व समृद्ध भूतकाल साजरा करणारी, शतकानुशतके त्या प्रांतातील लोकांच्या दृष्टीआड झालेले लोकसाहित्य व लोकसंस्कृति पुनः प्रस्थापित करणारी गाणी गाऊं लागली म्हणजे तिच्या भेटीला येणारे गावकरी व शहरवासी सारखेच आकर्षित होत. विस्मृत बंडखोर, विस्मृत कथा, विस्मृत सामाजिक सद्गुण पुनः प्रकाशात आणण्याचे हे थोर ओझे पत्करणारा गायक म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून अविश्रांत परिश्रम करणारे झवेरचंद मेघाणीच होत. कोठल्याही दिवशी ते कोणालाही सौराष्ट्रात हिंडताना, माहिती गोळा करताना, माणसे जमवताना, गोष्टी गोळा करतांना दिसले असते. जे काही उमदे व शक्तिशाली ते मेघाणींच्या चैतन्यात गुंफले गेले होते. माणूस मेघाणी, पत्रकार मेघाणी, लेखक मेघाणी हे लोकविलक्षण व्यक्तिमत्व होते. गुजराती साहित्यात एखाद्याच्या ठिकाणी कवित्व, गायनाची कला व संशोधनाची कला ही क्वचितच एकत्र आलेली आढळतील. कोठल्याही कवीने लोकसाहित्यासाठी मेघाणींच्या सारखे परिश्रम केलेले नाहीत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास अशिक्षित जनतेला उद्युक्त करण्यासाठी कोणाही पत्रकाराने आपली लेखणी राबवलेली नव्हती. कोठल्याही कवीने कधीही जनतेखातर त्यांच्या सारखा स्वार्थत्याग केलेला नव्हता. असे हे झवेरचंद मेघाणी प्रादेशिक भाषेत लिहूनही यथार्थतेने राष्ट्रीय शाहीर झाले. सुमारे ऐंशी वर्षांपूर्वी जन्मलेल्या याच

माणसाने सौराष्ट्रातील जनतेला व समस्त गुजराती भाषिकांना भावनांनी व वीरवृत्तीने हलवून सोडले तसे या पूर्वी कोणी केले नव्हते व नंतरही केले नाही. ते मूलतः क्रियाशील व भावनाशील होते. बुद्धिमत्तेचे मोठे भांडार आपल्याजवळ असल्याचा दावा त्यांनी कधी केला नाही. परंतु त्यांच्याप्रमाणे फार थोड्या माणसांना लोकांच्यावर प्रभाव पाडणे जमते. एरवी अनेकांना प्रयत्नांतीहीं त्यात यश लाभलेले नाही. कवि हे जगाचे मान्यता न पावलेले मार्गदर्शक आहेत, असे शेली म्हणाला होता. पण मेघाणी या विधानाला अपवाद ठरले यात फारसे आश्चर्य नाही. मेघाणींच्यासारखे कवि असताना राष्ट्र कोठल्याही आपत्तीने डगणार नाही किंवा विकलांग होणार नाही. आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत मेघाणी हे राष्ट्रीय व वैयक्तिक पातळीवरील वीर्यशाली संघर्षांचे प्रतिक राहिले, परंतु सर्वच खऱ्या थोर व्यक्तींप्रमाणे आपली खाजगी दुःखे दाबून ठेवून ते सामाजिक दुःखाबद्दलच बोलत राहिले. जनतेसमोर ते जे गायले त्यात त्यांच्या प्रतिभेचा सच्चेपणा कायम राखला गेला आहे.

* * *

# मेघाणींचे जीवन आणि कार्य

गुजराती साहित्यात झवेरचंद मेघाणींचे स्थान अद्वितीय आहे. आपल्या अंतरदृष्टीच्या आज्ञेला अनुसरून त्यांनी व्यावहारिक सत्ता व प्रतिष्ठा या संबंधीच्या मोहांचा त्याग करून स्वतःला लेखन कार्यास वाहून घेतले. वीस वर्षात त्यांनी पुंस्तकामागून पुस्तके लिहून काढली. पन्नासाव्या वर्षी तीव्र हृदयरोगाने अचानकपणे गाठले जाण्यापूर्वी त्यांची ८८ पुस्तके प्रसिद्ध झालेली होती. त्यात कादंबऱ्या, कविता, लघुकथा, शौर्यकथा व समीक्षा या वाङमय प्रकारांचा समावेश होता. तसेच एक कवी न थकलेले पत्रकार या नात्याने जीवनाच्या अनेक क्षेत्रांत ते देशाची सेवा करीत राहिले. मग तो त्या काळच्या संस्थानी राज्यातील प्रजेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न असो, कोणाचा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा प्रश्न असो, किंवा ज्याचा फेरविचार होणे आवश्यक असा सामाजिक प्रश्न असो. १७ ऑगस्ट १८९७ रोजी त्यांचा जन्म झाला व ९ मार्च १९४७ रोजी बोटाद येथे त्यांना देवाज्ञा झाली. वयाची पंचाविशी होण्या आधीच त्यांनी लेखनास सुरुवात केली.

साहित्य कृतीचे रसग्रहण करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. एखाद्या कृतीचा संबंध लेखकाशी जोडला जाऊ शकेल किंवा त्याच लेखकाच्या इतर कृतींशी त्याची तुलना करता येईल. अंतिम उद्दिष्ट लेखकाच्या मताचा, त्याच्या भूमिकेचा जीवनदृष्टीचा शोध घेणे हा असेल. अर्थात लेखकाचा व त्याच्या साहित्य कृतींचा परस्पर संबंध फारच सूक्ष्म असतो. म्हणून कृतीत काय सांगितले आहे यावरून लेखकाबद्दल कोठल्याही प्रकारचे आडाखे बांधणे धोक्याचे असते. जीवन गूढ व सूक्ष्म असल्यामुळे साहित्याच्या आधारे लेखकाचे जीवन जाणणे जवळ जवळ अशक्यच असते. तेव्हा मेघाणींच्या साहित्याचे साहित्य म्हणून मूल्यमापन होऊ शकले तरी त्यावरून त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन करता येणार नाही. डॉ. उमाशंकर जोशी यांच्या एका बहुमोल लेखावरून किंवा मेघाणींच्या काही मित्रांनी त्यांच्याबद्दल जे म्हटले आहे त्यावरून व प्रा, कनुभाई जानी यांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्रातून त्यांच्या

जीवनासंबंधी माहिती मिळवणे शक्य होईल. स्वतःच्या जीवनाविषयी खुद्द मेघाणींनी काय म्हटले आहे तेही या संदर्भात मनोवेधक होईल. ते म्हणतात, "आत्मचरित्र लिहिण्याची हिंमत माझ्यात नव्हती. मीच माझे चरित्र लिहिले तर ते विडंबनासारखे दिसेल. आयुष्यात आठवण्यासारखे असते त्यापेक्षा विसरण्यासारखे अधिक असते. आणि लोकांच्या पुढे ठेवायचे ते नेहमी तुटपुंजेच असते. आणि त्यात देखील आपण प्रामाणिक राहण्याचा कितपत संभव? अजिबात नाही. आत्मचरित्र लिहिण्यासाठी आपल्या आयुष्यातले कमकुवत दुवे वेगळ्याच दृक्संदर्भात दाखवण्याचे सामर्थ्य, धैर्य आणि आत्मविश्वास आवश्यक असतो. हे गुण नसून चालण्यासारखे नाही. ते नसतील तर गप्प रहाणे हे अधिक चांगले." मेघाणींच्या लिखाणात आव नाही. त्यांच्या पत्रांचे ओझरते वाचन करणाराला देखील त्यांच्या व्यक्तित्वाच्या पारदर्शक सच्चेपणाची खात्री पटेल. राजकोट येथील गुजराती साहित्य परिषदेच्या साहित्य विभागाचे अध्यक्षपद नाकारतांना, 'माणसाईना दिवा' या पुस्तकास मिळालेले महिडा पारितोषिक नाकारताना, डॉ. उमाशंकर जोशी किंवा सुंदरम् यांच्याकडून खराखुरा अभिप्राय जाणून घेताना किंवा आपल्या दुसऱ्या लग्नात कोठलीही प्रागतिकता नसल्याचे सांगताना ( एक समाजसुधारक म्हणून मी हे पाऊल टाकलेले नाही. परंतु मी फक्त आमच्या सोयीचा विचार केला आहे. ) किंवा लेखनाच्या बाबतीत 'सारावेळ सर्जनशील किंवा स्वतंत्र शैलीत लेखन करणे हे आपल्याला जमणे कठीण.' असे काहीशा थट्टेने म्हणणे, "माझे लेखन कधीच मौलिक नसते" किंवा "मी एक साधासुधा, परिस्थितीच्या रंगाने रंगलेला पदवीधर माणूस. लेखनाकडे एक प्रामाणिक व्यवसाय म्हणून वळलो." "मी म्हणजे कोणी मोठा विचारवंत किंवा प्रतिभाशाली लेखक नाही. राजकीय पत्रकारित्व सोडून देऊन माझी लेखणी शुद्ध साहित्य निर्माण करील असा मला भरवंसा नाही" हे उद्गार म्हणजे वाङ्मयाच्या क्षेत्रात क्वचितच दिसणारे संवेदनशील नम्रतेचे व वस्तुनिष्ठेचे उदाहरण आहे. आपल्या भोवतालच्या जगात असे किती लोक आहेत? मेघाणींनी स्वतःच्या दुःखाकडे क्वचितच लक्ष दिले. इतरांच्या दुःखांना वाचा फोडण्यातच ते संपूर्णपणे मग्न राहिले.

माणसाने कितीही संयम राखण्याचा प्रयत्न केला तरी त्याला आपण जे जे सहन केले त्याबद्दल, स्वतः समोर ठेवलेल्या आदर्शाबद्दल व इच्छांच्याबद्दल परोक्ष अभिव्यक्ति देखील टाळणे कठीण जाते. म्हणून लेखनकृति व लेखक काय असू शकेल यांच्या मधल्या काहीश्या संबंधाची कल्पना करणे शक्य आहे.

मनोविश्लेषणाच्या शास्त्रात जसजशी प्रगति होत जाईल तसतसे लेखकाच्या कृतीत जे व्यक्त झाले आहे त्यावरून त्याच्या मनाचे गूढ उकलणे शक्य होईल.

श्री मेघाणींनी १९२२ साली लिहिण्यास सुरुवात केली व १९४७ साली मृत्यूबरोबरच ते थांबले. एकूण पंचवीस वर्षाचा हा कालखंड. त्यांच्या पहिल्या पंचवीस वर्षांच्या अनुभवाचे, विचारांचे आणि जाणिवांचे सार त्यांच्या साहित्यात आलेले आहे. कलकत्त्याच्या एका ॲल्युमिनिअमच्या फॅक्टरीतली चांगली नोकरी सोडून सर्मपित वृत्तीने, अविरत उत्साहाने सौराष्ट्रातील वीरगाथा लिहिण्यात त्यांनी आपले व्यक्तित्व जोपासले. कलकत्त्यातील आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी म्हटले आहे, ' लिहीत रहाणे सर्वकाल लिहीत रहाणे मला आवडेल. ' तथापि लेखन कार्य करीत असतानाच्या काळातील अनुभव त्यांच्या लेखनात व्यक्त झाले की नाही याबद्दल शंका वाटते. कारण मेघाणी हे आत्मनिष्ठ लेखक नाहीत. आपल्या लेखनातून व त्यातील पात्रातून ते वस्तुनिष्ठपणे जगतात.

सामान्यतः साहित्यकृतीत आत्मगत घटकाना प्राधान्य असते पण मेघाणींच्या साहित्यात त्यांना गौणत्व येते. सत्यनिष्ठेने जसे त्यांनां आत्मचरित्र लिहिण्यापासून परावृत्त केले आणि स्वतःला कवितेचा जुळारी म्हणवून घ्यायला लावले त्याचप्रमाणे वीरवृत्ती बद्दलच्या त्यांच्या भक्तिभावनेनेही त्यांना आपल्या व्यक्तित्वाचे आत्मगत घटक दडपून टाकावयास लावले. ही वस्तुनिष्ठा हा मेघाणींच्या साहित्याचा मूलभूत गुण आहे. लोकसाहित्याचे अनन्य भक्त असल्यामुळे त्याच्या उपासनेत ही वस्तुनिष्ठा, जी जगातील कोठल्याही लोकसाहित्याच्या बाबतीत नेहमीच दृष्टीस पडते, ती ते नेहमीच जोपाशीत राहिले. त्यांच्या कादंबऱ्यात मात्र अपवाद म्हणून बंध काही जागी थोडेसे सैल झालेले आढळू शकले असते परंतु तेथेही ते मूक साक्षिदारच आहेत. त्यांच्या व्यक्तिगत भावनांना ते वश होत नाहीत, प्रथम पत्नीचा मृत्यू, कौटुंबिक जीवनातील संघर्ष व दडपणे, कर्तव्याबद्दलची निष्ठा या सर्वामुळे ते माणसाचा शोध घेणारे, त्याच्यावर प्रेम करणारे झाले. डॉ. उमाशंकरांना व इतर मित्रांना लिहिलेल्या त्यांच्या पत्रातून हे खूपसे व्यक्त झाले आहे. माणसा माणसातील संबंधाची त्यांना भूक होती. सभा संमेलनातील सर्व मतभेद व संघर्षापासून ते दूर राहिले. मेघाणींच्या मते ' मोल आहे ते प्रेमाला. मोठेपणाला नाही. ' ' साहित्याच्या क्षेत्रात मी तुमच्याकडून मोठा नाही ' ते डॉ. उमाशंकरांना म्हणतात, ' मी मोठेपणाच्या मागे नाही. दुसऱ्याच कसल्यातरी शोधात आहे. '

ते वैयक्तिक संबंधांच्या शोधात होते. आपल्या मित्रांच्या कृतीसंबंधीच्या स्वतःच्या मताचा मैत्रीशी संबंध नव्हता. माणसावरच्या या त्यांच्या प्रेमामुळेच दरवडेखोरांशी संपर्क साधून त्यांच्यातले सामर्थ्य, जोम व जीवनाबद्दलचा त्यांचा अभिमान यांचे गुणग्रहण ते करू शकले. जीवनावरच्या या प्रेमाला त्याच्या विकृत स्वरूपात समलिंगी प्रेमाचीही छटा येऊ शकते हे त्यांच्या 'निरंजन' वरून दिसून येते.

उदासपणा हे या लेखकाचे आणखी एक वैशिष्ठ्य आहे. या उदासपणाने त्यांना स्वतःला वार्धक्याची जाणीव स्वतःच्या अपेक्षेहून फार लवकर झाली. ही उदास वृत्ति त्यांच्या बऱ्याचशा कृतीत व्यक्त झाली आहे. आणि ती कोणाही वाचकाच्या मनाला हलवून टाकील अशी आहे. ही उदास छाया असूनदेखील मेघाणींच्या साहित्य निर्मितीचा आदर्श मात्र आधुनिक सुसंस्कृत लोकांच्या जीवनापेक्षा वेगळे मानले गेलेले जीवन रंगवणे हा होता. त्यांनी आपली सारी शक्ति ही आवड अभिव्यक्त करण्यासाठी खर्ची घातली आहे वृत्तपत्र व्यवसायातील धोके या आदर्श पत्रकाराने टाळले. सवंग वृत्तपत्र लिखाणाचा परिणाम साहित्यावर होण्याची शक्यता त्यांना चांगल्या प्रकारे कळली होती. आणि तरीही त्यांनी पत्रकार म्हणून सौराष्ट्रात काम केले. टीकात्मक लिहिताना त्याचबरोबर उत्तेजनात्मकही लिहिले. त्यांना तळमळ होती शुद्ध साहित्य निर्मितीची. आणि ज्या काळात लोकसाहित्य गोळा करण्याची साधने नसल्यासारखीच होती त्या काळात अव्वल दर्जाचे लोकसाहित्य संशोधित करणारे ते पहिलेच. आज त्या मानाने कितीतरी सोयी व साधने हाताशी असूनदेखील त्यांच्या तोडीचे लोकसाहित्याचे संकलन, संपादन वा संशोधन झालेले आढळत नाही. अशी थोरवी असूनही मेघाणी स्वतःला साहित्य मार्गावरचा 'एक छोटा पाईक' म्हणवून घेतात. लोकसाहित्याचा लेखक येवढीच स्वतःची आठवण मागे रहावी अशी त्यांची इच्छा होती. लोकसाहित्यात जे काही सामान्य असेल तो आपला सामान्यपणा आहे असे ते वारंवार भारपूर्वक सांगत. पण ही 'सामान्यता' मोजायची कोणी हा प्रश्न आहे.

* * *

# काव्य

मेघाणीच्या साहित्यात लोकसाहित्यानंतर क्रम आहे तो काव्याचा. तथापि गुजराती कविमंडळात त्यांचे नेमके स्थान सांगणे अवघड आहे. मात्र कथालेखक व कादंबरीकार म्हणून गुजराती साहित्य समीक्षकांनी त्यांचे उच्च स्थान मान्य केलेले आहे. कवि म्हणून आपल्या काव्यांनी त्यांनी जनतेच्या कल्पनेचा स्फुल्लिंग फुलवला व लोकांची मने जिंकली परंतु टीकाकारांनी त्यांच्या कवितेला गुजराती काव्यात क्वचितच महत्वाचे स्थान दिले. प्रा. रा. वि. पाठक यांच्या मते मेघाणीच्या कौटुंबिक जीवनावरील व स्वातंत्र्य संग्रामावरील कविता नर्मद व खबरदार यांच्या साक्षात परंपरेतल्या आहेत. प्रो. मनसुखलाल झवेरी यांनी देशप्रेमाच्या सर्व प्रकारच्या छटा व आशय दाखवणारा कवि म्हणून मेघाणीना नावाजले आहे. कवीच्या स्वत:च्याच शब्दात "लाग्यो कुसुंबीनो रंग, हो राज मने लाग्यो कुसुंबीनो रंग. जननीना हैयामां पोढंता पोढंता पीधो कुसुंबीनो रंग" * हा त्यांच्या काव्याचा प्रमुख विषय आणि त्यांच्या परिश्रमांचे प्रमुख फलित आहे. १९२५ ते ४७ या काळात मेघाणीचे दहा लोकगीतांचें संग्रह व सहा इतर काव्य संग्रह प्रकाशित झाले. त्यापैकी वेणीना फूल (१९२८) किल्लोल (१९३०) युगवंदना (१९३५) एकतारो (१९४०) बापूना पारणां (१९४०) रवीन्द्र वीणा (१९४४) हे संग्रह विशेष महत्वाचे आहेत.

ही काव्ये कदाचित काळाच्या कसोटीवर टिकून रहाणार नाहीत किंवा त्यांची आशय घनता वा रचना कौशल्य परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. कल्पनाजन्य किंवा ऐन्द्रीय अनुभूतीचा ठसा उमटवून काव्यरसिकांच्या हृदयात रहाण्यासारखीही ती काव्ये नसतील. अंत:चित्र उभे करण्यासारखे त्यात काही नाही. तरीपण सामान्य माणसाच्या मनाचा ठाव घेतील असे, अंतरीच्या तळमळीतून निघालेले ते छंदोबद्ध उद्गार आहेत. मेघाणीनी आपण स्वत: श्रेष्ठ दर्जाचे

---

* अरे मित्रा, मी कुसुंबी रंगात रंगून गेलो आहे. प्रेम शौर्याच्या त्या धुंद रंगाचे पान मी आईच्या कुशीत पहुडलो होतो तेव्हाच केले आहे.

कवि असल्याचा दावा कधीच केला नाही. पण जो क्षण, जी व्यक्ति, जी घटना, जी भावना त्यांनी वर्णन केली तिला असे रुप दिले की वाचणाराला त्यांची शाहिरी शैली व ऐतिहासिक महत्व जाणवते.

क्वचितच आत्मनिष्ठ असणारी मेघाणींची कवने वस्तुतः जनतेचेच उद्‌गार आहेत. लोकांचे दैन्य, त्यांच्या व्यथा, त्यांच्या आकांक्षा, दुःखे आणि संघर्ष यांचे ते काव्य आहे. लोकांचा कवि या नात्याने त्यांनी स्वतकडे गौणत्व घेतले व वेगवेगळ्या संदर्भात, वेगवेगळ्या परिस्थितीत विविध प्रकारच्या व्यक्तींच्याद्वारे अविष्कृत झालेले व भोगलेले वस्तुनिष्ठ सत्य त्यांनी पाहिले व आपल्या काव्यातून व्यक्त केले. या कवितातून सर्वसामान्यपणे राष्ट्रीय पातळीवर व विशेषेकरून गुजरातने भोगलेल्या दुःखांचे चित्रण केलेले आहे. या कवितांनी लोकांची नाडी पकडली. या देशातील लोकांच्या श्वसितांची हवा, त्यांनी केलेला त्याग, त्यांनी सोसलेली दुःखे, त्यांनी जोपासलेले आदर्श झपाट्याने मावळत चाललेली संस्कृति आणि त्यांना परत मिळवावेसे वाटणारे स्वातंत्र्य हे सारे या गीतातून कळू शकेल.

हे करण्यासाठी केवळ स्वतःच्या कवित्वाशिवाय इतर भाषातील काव्य व इंग्लिश साहित्य यापासून ते खूप शिकले. काही कवितांचे गुजराती अनुवाद करताना ते शब्दशः केलेले आहेत असे नाही. मूळ कविता वाचून वाटलेले सारेच काही त्यात उतरवले असेही नाही. स्वतःला गुजराती काव्यात सोयीस्करपणे गुंफता येतील व साकार करता येतील तेवढ्याच भावना, तेवढेच विचार त्यांनी घेतले. याप्रमाणे त्यावर सोरठी रंग चढवण्यासाठी उसनवारी करून लोकांशी या काव्यांचे नाते जोडून दिले. उदाहरणार्थ त्यांची प्रसिद्ध कविता 'कोईनो लाडकवायो' ही 'समवडीज् डार्लिंग' या कवितेवर आधारित आहे. 'आखरी संदेश' ही 'न्यूज ऑफ दी बॅटल' वर तर 'सूना समदरनी पाळ' ही 'विजन ऑन दी ऱ्हाईल' वरून रचलेली आहे. 'रातां फूलडां' 'फाईन फ्लॉवर्स इन दी व्हॅली' वरून केली आहे. इंग्लिशमधील बॅलडच्या धर्तीवर मेघाणींनी समांतर काव्य रचना केलेली आहे. त्या लोकप्रिय पद्धतीचा खरे पहातां कवि म्हणून त्यांच्या घडणीवर मोठा प्रभाव पडलेला आहे. त्यांच्या 'सिंधूडो' 'वेणीना फूल' 'युगवंदना' 'पीडितोना गीतो' 'एकतारो' या कवितावरून हे सहज ताडून पाहता येईल. कित्येक टीकाकारांनी मेघाणी हे स्वतंत्र कविपेक्षा उत्तम अनुवादक होते या मुद्याकडे मुद्दाम लक्ष वेधले आहे. त्यांनी जवळ जवळ असे सूचित केले आहे की मेघाणींना लिहिण्यासाठी उद्युक्त

करावयास आधार हा लागतोच. मग ते मूळ कृतीचे रूपांतर तरी करतात किंवा मूळ स्वरूप वदलून टाकून त्यातून स्वतःची कृति निर्माण करतात. 'त्यांची किमया नेहमी दुसऱ्या कोणाच्या तरी सोन्यावर केलेली असते' हे विधान त्यांच्या कथा कादंबऱ्यांच्यापेक्षा त्यांच्या काव्यालाच अधिक लागू पडते.

पूर्वीचे कवि ज्याप्रमाणे केवळ प्रेम व निसर्ग विषयक भावकाव्यात गुरफटलेले होते त्यांच्याहून वेगळचा असलेल्या काही गुजराती कवींपैकी मेघाणी होते. अंतःकरणे चेतवणाऱ्या शब्दांनी ते लोकमानस जिंकू शकत. लोकांच्या वृत्तीतील जोमाशी मिळते जुळते जोमदार शब्द निवडून घेण्याची शक्ति मेघाणींच्या इतकी फार थोडचा लोकात होती. ज्यांना पराक्रमाची, वैभवाची आदर्शांनी ओतप्रोत भरलेल्या स्वतंत्र जीवनाच्या आनंदाची गोडी आहे अशा लोकांच्या मनात राष्ट्रीयतेचा आदर्श जोपासणारी गीते गाणाऱ्या मेघाणींना स्थान आहे.

'भडके बळघा शब्द झझळता खूंचता कंठे कारी
रस ना वीरा वहावी शके अे रसना बळो अमारी'[१]
'नथी जाण्युं अमारे पंथे शी आफत खडी छे
खबर छे अेटली के मातनी हाकल पडी छे' [२]

जालियनवाला बागेतील कत्तल, गांधीजींचे गोलमेज परिषदेसाठी प्रयाण, असे स्वातंत्र्य आंदोलनातील महत्त्वाचे प्रसंग, अथवा लोकांचे दैन्य मेघाणींच्या काव्यातून व्यक्त झाले. त्यातील काही काव्ये तर भावनाशील वाचकाच्या डोळ्यात पाणी आणणारी आहेत. 'हजारो वर्ष जूनी अमारी वेदनाओ' किंवा 'जागो जगना क्षुधार्त, जागो दुर्बल अशक्त' या काव्य पंक्तींनी लोकांना जिंकून कवीने आपल्या इच्छेप्रमाणे वळवले. लोकसेवेची ज्वलंत तळमळ व लोकांच्या यातना कमी करून त्यांचे आदर्श पूर्ण करण्याच्या चाकोरी बाहेरील काम काजाच्या इच्छेमुळे निसर्ग सौंदर्याची किंवा एरवी काव्यमय असणाऱ्या आवडत्या मनोवृत्तींची काव्ये करण्याकडे त्यांनी पाठ फिरवली. हा मातीचा कवि. त्यांच्या काव्यात लोकांची सुखदुःखे त्यांना समजतील व जाणवतील अशा

१ जळत्या ज्वालेतून बुडवून काढलेले शब्द कंठ जाळीत आहेत हा जळता रस वहावू शकत नसेल तर आमची रसना जळून जावो.

२ आमच्या मार्गात कोठल्या आपत्ति आहेत ते आम्ही जाणत नाही, मातेने हाक दिली आहे येवढेच आम्हाला ठाऊक आहे,

शब्दात व त्यांना आवडतील आणि गाता येतील अशा ताला सुरात प्रतिबिंबित झाली. समाजातील वरपासून खालपर्यंतचे लोक ही गाणी सारख्याच आवडीने गाऊन एखादा समारंभ साजरा करूं शकतात. जोशीलया अंत:करणाच्या लोकांच्या व्यथा व सामान्य निरागस लोकांचे सर्वंकष प्रेम या संबंधीच्या वर्णनाचा आनंद लोक इतक्या उत्कटपणे अनुभवू शकतात की त्यामुळे भान हरपून जोमाने काम करण्यास प्रवृत्त होतात. मेघाणींच्या बऱ्याचशा कविता कृति किंवा घटना यांनी प्रेरित झालेल्या किंवा कृति आणि घटना यांनी ओतप्रोत भरलेल्या असतात. त्यांच्या कवितातील प्रचंड, सरळ प्रवाहाचा तालबद्ध ठेका माणूस श्वास रोखून ऐकू लागतो. भूमि व भूमीशी संबंद्ध असे जे आहे ते स्वर्ग व स्वर्गीयतेहून त्यांच्या आत्म्याच्या प्रकृतिला जवळचे आहे. अशा या कवितात जनतेची आगेकूच गाणारे पोवाडयांचे लोकप्रिय संगीत आहे.

असे म्हणताना त्यांच्या लोकप्रिय चालीवर रचलेल्या शिशुगीतांची उपेक्षा करावयाची नाही. कवीचे कोणत्याही प्रकारे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या अशा 'वेणीना फूल' किंवा 'किल्लोल' सारख्या कृतींच्याकडे द्यावे तसे लक्ष दुर्दैवाने दिले गेलेले नाही. या कवितांना मेघाणीच्या साहित्यात महत्वाचे स्थान मिळाले पाहिजे. या कवितांनी एक दिशा दर्शवली होती. परंतु इतर अनेक राजकीय व सामाजिक घडामोडीत गुंतल्यामुळे या दिशेने त्यांनी विकास केला नाही. या काव्यांचा आणखी एक विशेष म्हणजे जर कविने मनात आणले असते तर मातांना व मुलांना आनंद देणारी गाणी ते गाऊं शकले असते.

कविने आपल्या काळाशी सुसंगत असण्याला ऐतिहासिक महत्व नसेल. परंतु काळाशी सुसंगत कवि नसणे हा काही मोठा सद्गुण आहे असे नाही. मृत्यूला पंचवीस वर्षाहून अधिक काळ लोटून गेल्यावर अजूनही मेघाणी अत्यंत लोकप्रिय कवीपैकी एक आहेत ही वस्तुस्थिती कवि म्हणून त्यांचे सामर्थ्य सिद्ध करण्यास पुरावा म्हणून पुरेशी आहे. ते काव्य गायक आहेत. त्यांचा कंठ सुरेल आहे ते संगतवार नोंद करून ठेवणारे आहेत. ते आजूबाजूच्या लोकांच्या श्वाच्छोवासात आहेत.

* * *

# कादंबरी

गुजराती साहित्यात विकसित होत जाणारा अत्यंत लोकप्रिय प्रकार, कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न करण्याइतपत परिपक्वता १९३२ पर्यंत मेघाणीच्यात आली होती असे म्हणता येईल. १९ व्या शतकातील बऱ्याच पाश्चात्य लेखकांप्रमाणें मेघाणीनी वर्तमानपत्रात क्रमशः कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. त्या व्यवसायाशी जवळचा संबंध असल्याने त्यांना ते सोपे गेले. १९३२ ते ४७ या काळात त्यांनी सुमारे १४ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यात 'निरंजन' 'सोरठ तारां वहेता पाणी' 'वेविशाळ' 'रा' गंगाजळियो' व 'प्रभु पधार्या' या नाव घेण्याजोग्या आहेत. त्यांची पहिली स्वतंत्र कादंबरी 'निरंजन' १९३६ साली प्रकाशित झाली. तसा १९३२ साली त्यांनी अप्टन सिंक्लेजरच्या 'सॅमुअल द सीकर' चा अनुवाद 'सत्यनी शोधमां' केला होता. या कादंबरीतील गरिबांच्या व शोषितांच्या दुःखाचा आवाज समाजातील दलितोद्धारासाठी समर्पण करणाऱ्या गांधी युगाची आठवण करून देतो. या कादंबरीत श्रीमंतांची दुष्कृये व विषय लंपटता भरपूर भरलेली आहे. नायक एक सरळमार्गी गावकरी असून श्रीमंतांच्या भ्रष्टाचाराला वळी पडलेला आहे. व्यक्तिचित्रण किंवा सामाजिक संदेश या दोन्ही बाबतीत या कादंबरीने काही विशेष साधले आहे असे नाही. अतिरंजित पार्श्वभूमिमुळे तिच्याकडे लक्ष वेधते. या शतकाच्या चौथ्या दशकात आपल्या देशात जे सामाजिक तत्वज्ञान मूळ धरू लागले होते त्याचा प्रचार करण्याची लेखकाची इच्छा त्याच्या या अमेरिकन कादंबरीच्या पसंतीवरून दिसून येते. ते त्यावेळी संपादन करीत असलेल्या फुलछाब या साप्ताहिकाने मोफत भेट म्हणून दिलेली ही कादंबरी दुय्यम दर्जाची आहे असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांची दुसरी कादंबरी 'बीडेलां द्वार' ही देखील अप्टन सिंक्लेअरच्या 'लव्हज् पिलग्रिमेज' चा अनुवाद आहे. या कादंबरीचा नायक अजित हा लेखक आहे. तो प्रभा या कलाकार स्त्रीच्या प्रेमात पडतो. ते दोघे लग्न करतात व लग्नाची सुरुवातीचीं वर्षे सुखासमाधानात जातात. मुलाच्या जन्मानंतर प्रभा घरकामात अधिकाधिक व्यग्र होतं. त्यामुळे नवरा

तिच्यापासून दुरावतो. तिला दुसऱ्या एका माणसाबद्दल जवळ जवळ आकर्षण वाटू लागते. अजितला जीवनातील आदर्शवादी दृष्टीकोनामुळे संघर्षाचा व मतभेदांचा अनुभव येतो. या कादंबरीत आत्मचरित्रात्मक तत्व असण्याचा संभव आहे. नायकाने अनुभवलेली दुःखे लेखकाच्या आयुष्यातील अनुभवांचे आपल्याला सहज स्मरण करून देतात. या कादंबरीतील चरित्रचित्रण जरा सुधारलेले आहे. तिच्या वेगवेगळ्या भागात जो विस्कळितपणा आलेला आहे तो नसता तर ही कादंबरी बरीच यशस्वी होऊं शकली असती. 'अपराधी' ही त्यांची तिसरी कादंबरी. हॉलकेनच्या 'मास्टर ऑफ मॅन'चे हे भाषांतर आहे. तिच्यातील सामाजिक प्रश्न असामान्य आहे असे नाही. नायक शिवराज हा अजवाळीला भेटतो. तिच्याबरोबरच्या त्याच्या प्रेम प्रकरणाच्या परिणामी मूल जन्माला येते. त्याची हत्या होते. या गुन्ह्याचा खटला होऊन शिक्षा व्हावयास हवी. न्यायाधीश शिवराजच आहे व जर कोणी गुन्हेगार असला तर तो तो स्वतःच आहे याची त्याला जाणीव आहे. ज्या वासनेमुळे तो अजवाळीच्या शरीर सौंदर्याला बळी पडला ती त्याच्या मनाला तीव्र डागण्या देते व त्यामुळे एखाद्याला आपला अपराध माहीत असावा पण तो उघडपणे कबूल करता येऊ नये व तो सहनही होऊं नये अशा स्थितीत तो सापडतो. अपराध कबूल करावा तर आपल्या सामाजिक स्थानापासून आपले अधःपतन व त्याबरोबरच अजवाळीचाही सर्वनाश होईल असेही दाटत होते. या कादंबरीत मेघाणीनी आतापर्यंत घेतले होते त्याहून अधिक स्वातंत्र्य घेऊन घटना व प्रसंगांच्या मांडणीतही सूट घेतलेली दिसून येते. तथापि काही प्रसंग त्याना अधिक जिवंत व मर्मभेदक करता येण्यासारखे होते. 'वसुंधराना वहालां दवलां' ही त्यांची त्या नंतरची कादंबरी व्हिक्टर ह्यूगोच्या लाफिंग मॅनवरून रचली असली तरी अधिक स्वतंत्रपणे लिहिली आहे. यातील पात्रे समाजाच्या अगदी खालच्या थरातील आहेत. व सुसंस्कृत म्हटल्या जाणाऱ्या वर्गाची असंस्कृत निष्ठूरता त्यात भरपूर आहे. नायिका देखील समाजाच्या अगदी खालच्या वर्गातली आहे. ती एका श्रीमंत माणसाच्या प्रेमात पडते व ओठ फाटक्या मुलाची आई बनते. गुजराती साहित्यात समाजातील खालच्या स्तरात सहज आढळणाऱ्या व्यक्ति व प्रसंग यांचे चित्रण करणारी ही पहिली कादंबरी. चाकूला धार लावणारा, गोंदणारा, फण्या विकणारा आणि असेच इतर अनेक लोक या कादंबरीत येतात. अशा माणसांच्याबद्दल माहिती ,असल्याचे किती कादंबरीकार सांगू शकतील ? अशा माणसांशी संपर्क नाही हे गुजराती कादंबरीतील खऱ्याखुऱ्या

नाविन्याच्या अभावास जबाबदार आहे. प्रतिष्ठित समजले जाणारे व सामाजिक दृष्टचा मागासलेले लोक यांच्यातील कृत्रिम विभाजन मेघाणींना बिल्कुल पसंत नसे. गुजराती कादंबरी लेखनात नवीन पायंडा पाडणारी कादंबरी म्हणून तिचे ऐतिहासिक महत्व नाकारता येणार नाही.

आतापर्यन्त प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यातून मानवतावादी मेघाणी प्रगट झालेले दिसतात. त्या मानवतावादाने त्यांना शिष्ट समाजाने उपेक्षित ठरवलेल्या लोकातील शौर्य, शक्ति, चारित्र्य व मनाचे वैभव पहाण्याची प्रेरणा दिली. लोकसाहित्य शोधीत असता, त्याचप्रमाणे कादंबऱ्यातील पात्रे शोधीत असता, समाजाच्या या खालच्या थरातील मानवता उघड करणे हा मेघाणींचा हेतू होता. मेघाणीनी हे केले ते केवळ गांधीचे अनुयायी म्हणून नाही पण स्वतःच्या अंतःप्रेरणेने केले.

मेघाणीनी काही सनातन जीवनमूल्याविषयीची आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी सामाजिक कादंबऱ्या व लघुकथा लिहिल्या हे दाखवून देता येईल. पूर्वेच्या व पश्चिमेच्या संघर्षाची कथा या कादंबऱ्यात चांगल्या प्रकारे सांगितलेली आहे. जुनाट असेल ते टाकून नव्यावर केलेले प्रेम यातील बहुतेक कृतीत स्पष्ट दिसते. परंतु जुन्यातूनही सद्गुण, धैर्य व मानवता शोधता येईल असे मेघाणी मानतात. नवे वरून दिसे तेवढे समृद्ध नव्हते. त्यातही दंभ होता स्वार्थ व निष्ठुरता होती. एका समीक्षकाने म्हटल्याप्रमाणे मेघाणीनी याबाबतीत घेतलेल्या भूमिकेची गरज सतत भासत आली होती. जुन्यातील सत्व व नव्यातील हिणकसपणा दाखवून देणारे गुजराती कादंबरीकारातील पहिले असल्याचे श्रेय त्यांचे आहे.

विशिष्ट काळातील, विशिष्ट समाजातील सांस्कृतिक मूल्यांच्या स्वीकार्यतेचा वा अस्वीकार्यतेचा अंदाज आपल्याला तत्कालीन सामाजिक कादंबऱ्यावरून येऊ शकतो. हे विधान गुजराती कादंबऱ्या ज्याप्रकारे लिहिल्या गेल्या त्या प्रकारच्या बाबतीत विशेषेकरून खरे आहे. नर्मद युग अथवा सुधारणा युग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळात गुजराती समाजात जी प्राचीन भारतीय मूल्ये प्रचलित होती त्यांची नव्याने परीक्षा केली गेली. काही जुनी मूल्ये राहिली परंतु बरीचशी जुनी मूल्ये वेगळ्या प्रकारच्या समाजव्यवस्थेत बसण्यासारखी नसल्याने त्याच्याबद्दल प्रश्न उठवण्यात आले. त्यानंतरच्या पंडित युग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळात गोवर्धनरामानी आपल्या कादंबऱ्यात काही जुनी

मूल्ये संभाळण्यावर भर दिला. तसेच समाजाने नवी मूल्ये आत्मसात करण्याची जरूर असल्याचेही भारपूर्वक प्रतिपादन केले. नेहमी चालत आलेल्या मूल्यांचा संघर्ष चांगला जाणणाऱ्या मेघाणींनी हा नव्याचा शोध व जुन्याचा मान ठेवणे त्यांच्या आधीच्या लोकाप्रमाणे पुढे चालवले. परंतु नव्या जुन्याचा समतोल थोड्यांना राखता येतो. नवे म्हणजे क्षणिक तरंग नाही परंतु समाजधारणेस चिरस्थायी करणारी अशी मूल्ये असावयास हवी. गुजरातेत व इतर प्रांतातही नवे म्हणजे पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचा व इंग्रजी राज्याचा प्रत्यक्ष परिणाम होता. पश्चिमेकडील दिखाऊ झगमगाटाने नवशिके दिपून गेले होते. नर्मद, गोवर्धनराम किंवा मेघाणी यांच्याप्रमाणे पूर्व व पश्चिमेचा समतोल राखण्याइतका धीर असणारे विरळाच. 'तुळशीक्यारो' 'निरंजन' 'वेविशाळ' मध्ये मेघाणींनी जुन्यांचे शहाणपण व दुसऱ्या बाजूस नव्यांचा उथळ स्वार्थीपणा पुरेसा दाखवलेला आहे. 'निरंजन' व 'तुळशीक्यारो' मध्ये जुन्याची उदारता, मृदु धीरगंभीरा, व नव्याची स्वार्थी संकुचित मनोदशा यातील विरोधाभास आहे. 'वेविशाळ' मध्ये कवडीचुंबक चंपकलालची असंस्कृत रीतभात व शेठ दीपचंद यांची संस्कारी वर्तणूक यातील विरोधाभास आहे.

समलिंगी प्रेमासारख्या धक्का देणाऱ्या विषयाला स्पर्श करणाऱ्या सुरुवातीच्या थोड्या कादंबऱ्यापैकी 'निरंजन' आहे. या प्रश्नाकडे पहाण्याची दृष्टी कशीही असो नायकाचा त्याच्या कॉलेजातील सहकाऱ्यांशी संघर्ष, बद्धिमान म्हणवणाऱ्या प्राध्यापकांची, सामाजिक मान्यतेहून कितीही वेगळी असली तरी मानव सुलभ अशी ही गोष्ट समजून न घेण्याची हतबल असमर्थता व निर्लज्ज स्वार्थीपणा हे सारे मनाची पकड घेणारे आहे. मेघाणींच्या कादंबऱ्यातील नेहमीच्या संघर्षात या संघर्षाची भर पडलेली आहे. प्रतिष्ठित आईबापाची मुलगी व नायकाच्या प्रेमात असलेली मुलगी यातून वधू म्हणून कोणाची निवड करावी ही ओढाताण, शेवटी नायकाने दिवाणाची मुलगी पसंत करून स्वतःच्या खऱ्या भावनांना चिकटून राहून आपल्या मान्यतांच्या बाबतीत खंबीरपणा दाखवण्याची आपली असमर्थता पुरेशी दाखवली आहे. मेघाणींच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणे 'निरंजन'ची रचनाही विस्कळित आहे त्यामुळे या कादंबरीत डाकूंच्यावरील काही कादंबऱ्यात सहज साधलेल्या वातावरण निर्मितीचा अभाव जाणवतो.

पैशाच्या प्रमाणावरून नाते ठेवणाऱ्या समाजात वचनाची किंमत टिकवण्याचा 'वेविशाळ' हा एक प्रयास आहे. पाश्चिमात्य शिक्षणामुळे

वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात स्त्रीचा प्रवेश झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांना स्पर्श करण्याच्या मेघाणीच्या इच्छेचे 'तुळशी क्यारो' हे आणखी एक उदाहरण आहे. इतर कृतीप्रमाणे येथेही लेखकाने आधुनिक स्त्रीची सावध रहाण्याची अक्षमता व बदलत्या समाजरचनेतील पुरुषाची क्षुद्रता, दोघांच्या बाबतीतले हे सत्य सोदाहरण समजावले आहे. अशिक्षित पत्नीला टाकून वीरसुत कांचन नावाच्या फॅशनेबल, वितंडवादी मुलीशी लग्न करतो. आपण खरोखरीच काय करीत आहोत हे न कळता ती जवळजवळ नीतिभ्रष्ट होते. तिला वाचवणारे नायकाचे वडील सोमेश्वर वडीलकी, धैर्य व शहाणपणाचे प्रतिक ठरतात.

मेघाणींच्यातल्या कादंबरीकाराच्या जन्माच्या कारणाबद्दल कोणाचे काही मत असले तरी 'सोरठ तारां वहेता पाणी' या प्रकाशनात त्यांचे खरे मूळतत्व असावे असे निश्चित वाटते. येथे सौराष्ट्रातील वातावरण व जीवन उत्साहाने व जोशाने पुन: जिवंत केले आहे. या कादंबरीत समाजाच्या वेगवेगळ्या भागातील पात्रे भरपूर आहेत. व त्यांचे विचार, त्यांच्या भावना, त्यांच्या हालचाली टिपून अत्यंत सहजपणे व्यक्त केल्या आहेत. सोरठच्या टेकड्या, नद्या आणि प्रत्यक्ष भूमि कादंबरीत सहभागी झालीशी वाटते.

व्यापार धंद्याच्या निमित्ताने गुजराती लोक अग्नेय व पश्चिम अशियातील वेगवेगळ्या ठिकाणी स्थायी झाले आहेत. ग्राहकांचे शोषण करण्याच्या त्यांच्या रितीमुळे मेघाणी व्यथित होते. गुजरात्यांनी वसाहतीत चालवलेल्या शोषणाविरुद्ध मेघाणींनी विरोधाचा आवाज उठवावा हे नवल वाटण्यासारखे आहे. मानवतावादी मेघाणींच्या आत्म्याने त्या विरुद्ध बंड पुकारले. 'प्रभु पधार्या' मधे शोषणाबद्दल खंत करणारे मेघाणी दिसून येतात.

ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून मुनशी व धूमकेतू यांच्यानंतर मेघाणीचे स्थान आहे. लोक कथा, लोक संगीत, लोक संस्कृति हे त्यांचे क्षेत्र आहे. 'समरांगण' 'रा' गंगाजळियो' व 'गुजरात नो जय' २ भाग या त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यात ते इतिहासाची फक्त चौकट घेतात. परंतु जुन्यातील चैतन्य, धैर्य व त्यांची मूल्ये टिकवण्याची इच्छा कादंबरीच्या परिपोषामागचा विशेष हेतू आहे. 'समरांगण' मधे इतिहास व लोककथा यांचे मिश्रण आहे. पात्रांच्या धैर्यावर कादंबरीचा विकास उचलून धरला

जातो. रा ‘ गंगाजळियो ’ या कादंवरीत ‘ रा ’ मांडलिकाची कथा संत कवि नरसी महेताच्या कथेवरोवर गुंफलेली आहे.

‘ गुजरातनो जय ’ च्या दोन भागात जन्मभूमिवरचे प्रेम, शासक व शासितांची दूरदृष्टी व धैर्य दाखवण्याचा स्तुत्य प्रयत्न आहे. या कादंबऱ्या जैन रास व प्रवंधांच्या पुराव्याच्या आधारे, कोठल्याही अनिश्चित संज्ञेशिवाय १२ व्या शतकातील गुजरातच्या वैंभवाची नोंद ठेवतात. वस्तुपाल व तेजपाल या तत्कालीन गुजरातला संघटित करून प्रगति साधणाऱ्या द्वयाच्या चित्रणाची पद्धत कृतीस वेधक व जोरदार करणारी झाली आहे.

* * *

# लघुकथा

पत्रकार म्हणून स्वतः चालवीत असलेल्या साप्ताहिकात लघुकथा लिहिण्याचा मोह मेघाणीना साहजिकच झाला असावा. मेघाणीनी सौराष्ट्रातील लोककथांना व लोककाव्यांना नवी घडण, नवा आकार देण्याचा प्रयत्न केला.

लोकसाहित्याचा उपयोग करून घेतांना लघुकथेला नवा आकार हवा ही जाणीव असून देखील मेघाणीनी मुळाशी शक्यतो प्रामाणिक रहाण्याचा प्रयत्न केला. 'सौराष्ट्रनी रसधार' या पाच खंडात लोकजीवनावर आधारित शंभर कथा आहेत. परंतु कलेच्या दृष्टीने त्यांना लघुकथा म्हणता येण्यासारखे नाही. तथापि शंभरापैकी किमान पंचवीस कथा कथा या सदरात घालता येतील व बाकीच्या व्यक्ति चित्रे व प्रसंग चित्रे या सदरात मोडतील. 'वेरा' 'दीकरो' 'दस्तावेज' 'परणेतर' 'घोडानी परीक्षा' 'अणनम माथां' 'ओलीपो' या चांगल्या लघुकथा म्हणता येतील.

मेघाणीचा पहिला लघुकथा संग्रह 'चिताना अंगारा' १९३७ साली प्रसिद्ध झाला. त्यांच्या कादंबऱ्याप्रमाणे मेघाणीचा हा कथा संग्रहही तत्कालीन परिस्थितीचे वास्तव चित्रण आहे. एका समीक्षकाने दाखवल्याप्रमाणे या कथा लोकांच्या जुन्या चालीरीति व रूढी—ज्या झुगारून देण्याची जरूर आहे—त्या प्रगट करतात. आणि मेंघाणी जवळ जवळ प्रचारकी आवेशाने त्या चालीवर तुटून पड़तात. मेंघाणी ज्या काळात जगले तो काळच बव्हंशी काही अनिष्टांच्या बाबतीत त्यांनी घेतलेल्या भूमिकेस कारणीभूत होता. विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा काळ हा अज्ञान, सामाजिक अनिष्टे व भ्रष्टाचार ह्या विरुद्ध उभे ठाकण्याच्या आवेशाने भरलेला आहे. मेघाणींच्या कलेने ही अनिष्टे उत्साहाने उघड करावी ह्यात नवल नाही. शुद्ध कलेसाठी सामाजिक दंभाचा स्फोट व कलात्मक घाट यात नाजूक समतोल ठेवण्याची गरज असते परंतु मेघाणींच्या सारख्या सामाजिक सुधारणांना वाहून घेतलेल्या माणसाला

ह्या नाजूक तोल आपल्या कथाकादंबऱ्यात अथवा काव्यात देखील ठेवणे शक्य झाले नव्हते. एक पत्रकार व लोकसाहित्याचा रसिक म्हणून प्रवास करीत असता समाजाच्या वरच्या व खालच्या विविध स्तरातील लोकांशी मेघाणींचा संबंध आला. श्रीमंतांकडून कोणत्याही प्रकारे नाडल्या जाणाऱ्या गरीबांचे दुःख पाहून त्यांचे रक्त उसळत असे. ' सौराष्ट्र ' मध्ये मेघाणीनी लघुकथेचे कलात्मक तंत्र जोपासण्याचा सतत प्रयत्न केला. परंतु ' चिताना अंगारा ' मधील काही कथात जीवनातील प्रसंग जसेच्या तसे घेतलेले आहेत. या कथात संवेदना थिजून गेलेला पति, हृदयशून्य भारतीय सासूचा नमुना व दुःखी, क्षयी, नरम चंदन, बंडखोर वृत्तीची विधवा भद्रा, सदाशिव पोस्टमनशी लग्न करण्यासाठी तिने हिंमतीने दिलेली झुंज, रक्तपिपासू, बऱ्यावाईटाची चाड नसलेला सावकार कानजी शेठ, ही पात्रे ज्या सहा लघुकथात येतात त्यात ज्या समाजाशी त्या पात्रांचे नशीव जखडले गेले आहे त्या समाजाचे देखील चित्रण येते. यात वस्तुस्थितीचे चित्र प्रत्यक्षापेक्षा मोठे आहे. ' आपणां उंबरामा ' चे दोन खंड व ' धूप छाया ' हे त्यामानाने अधिक परिपक्व कथासंग्रह आहेत. येथेही विविध प्रकारच्या स्वभावाच्या, अनेक प्रकारची कामे करणाऱ्या व्यक्तींच्या चित्रणांचा मेळावा आहे. त्यात सैनिक, वारकेसारके दुकानदार, शेतकरी, घरगडी, आणि खालच्या स्तरातील असे अनेक लोक भेटतील. त्यांच्या कवितांप्रमाणे कथातही गरीबांचे दुःख ह्राच वारंवार येणारा विषय आहे समाजाच्या खालच्या थराबद्दल लिहितांना त्यांच्यावर धूमकेतू या दुसऱ्या प्रख्यात गुजराती कथा लेखकाचा प्रभाव असला तरी समाजाच्या दुर्बल घटकाबद्दल वाटणाऱ्या भावनात्मक ओढीमुळेच ते तसे प्रभावित झाले होते.

या कथातून मेघाणींमधील परिपक्व कलावंत सुरवातीच्या कृतीत विशेष दिसणारी विवशता व भावनांचे कढ टाकून देऊन निर्मिती करताना दिसतो. खरोखरीच कलात्मक कथाच तेवढया एकत्र करून मेघाणीनी दोन संग्रह प्रकाशित केले. ' कुरबानीनी कथाओ (१९२३) प्रतिमाओ (१९३४) पलकारा (१९३५) विलोपन (१९४६) ह्या त्यांच्या त्या आधीच्या संग्रहातून उत्तम अशा सतरा कथा निवडून लोकमिलापने १९७२ साली प्रकाशित केल्या.

तथापि मेघाणींवर दोन आक्षेप घेतले जातात. एक म्हणजे त्यांचा एकसुरीपणा व भूतकाळावरची भक्ति आणि दुसरा अतिरंजितता व अतिशयोक्ति. एका टीकाकाराने मेघाणीना ' भूतकाळाची तुतारी फुंकणारे ' म्हटले आहे. आणखी एक सहज लक्षात येते की त्यांचे म्हातारे हिशेबनवीस

कारकून व शाळामास्तर यांच्यावर आधुनिक प्राध्यापकांच्याहून अधिक प्रेम. आधुनिक प्राध्यापकांना उघडे पाडण्याची प्रत्येक संधी ते घेतात. स्वाभाविकच धैर्य, हिंमत आणि सनातन मूल्ये यांच्याशी जन्म गाठ असल्यासारखे मेघाणी वर्तमानापेक्षां भूतकाळावर अधिक प्रेम करतात व नव्या पिढीला मेकड मानतात. आणि तरीही आश्चर्य म्हणजे जीवनाविषयीच्या कोठल्याही एका ताठर दृष्टिकोनाची छाप त्यांच्या कलेला कुंठित करीत नाही. कलावंताच्या कलेविषयीच्या भूमिकेबद्दल 'घूपछाया' मध्ये चर्चा करताना मेघाणी सुचवतात की कलावंताने कोठल्याही एका बाजूच्या प्रचाराच्या इच्छेपासून अथवा जीवनाच्या क्रियाशील अभिनिवेशापासून मुक्त रहावे. आणि तरीही स्वतः मेघाणींनाही ते प्रत्यक्षात उतरवणे अवघड गेले.

अभिव्यक्तीसाठी साहित्याचे अनेक प्रकार स्वीकारणाऱ्या लेखकाला कथावस्तू व अनुभव एकाच विशिष्ट प्रकारासाठी राखून ठेवणे शक्य नसते. ज्यांना वाचकांची कथेची, कादंबरीची वा लोककथेची भूक रोजच्यारोज भागवावी लागते त्या पत्रकारांना तर ते अधिकच जड जाते. फक्त एक दोन साहित्य प्रकार घेऊन लिहिणाऱ्या लेखकांच्या लिखाणात असू शकेल तशी कथावस्तूंची विविधता मेघाणींच्या सगळ्या ८८ पुस्तकात नेंहमीच सापडेल असे नाही. तथापि केवळ अभिव्यक्ती, किंवा कथावस्तू अथवा विषय ह्यात साम्य असले म्हणून दृष्टिकोण, भूमिका, व साहित्यिक अनुभूतिची जाणीव ही एकाच प्रकारची आहे असे नाही. 'चिताना अंगारा' अथवा 'वहू अने घोडो' दोनच नावे, कथावस्तू तीच असूनही पात्ररेखाटन व कथेची मांडणी यामुळे मेघाणींच्या कृतीत अनुभववैविध्य येते हे मत वाचकांना पटवून देतील.

'वहू अने घोडो' या कथेबद्दल असे म्हणता येईल की एक लाजाळू निर्व्याज मुलगी श्रीमंतीच्या अभिमानाला कशी बळी पडते व सासरच्या मंडळींच्या असंस्कृत वागण्यामुळे सारे कसे गमावून बसते त्याची ही कथा आहे. कोणाही आधुनिक माणसाला त्याच्या कल्पनेतून नव्या मूल्यांच्या विरुद्ध जुन्या मूल्यांच्या द्वंद्वाचा सारा देखावा निर्माण करता येईल.

शैली; पात्र रेखाटन व वातावरणनिर्मिती हे कथालेखक मेघाणींचे मोठे गुण आहेत. त्यांच्या पात्र समुच्चयात विविधता भरपूर असून ती अविस्मरणीय आहेत. संवेदनशील मनाने व भावनोत्कट अंतःकरणाने मेघाणी माणसांच्या मेळाव्याचे चित्रविचित्र चौकटीतील चित्रण कोणाही वाचकाचे लक्ष वेधून घेईल

अशा प्रकारे करू शकले. तथापि समाजाच्या खालच्या थरातील पात्रांचे चित्रण उच्च थरातील पात्रांच्या चित्रणाहून बरेच आकर्षक आहे. मेघाणींच्या लघुकथातील वृद्ध स्त्रीया ही त्यांची गुजराती साहित्याला सर्वात मोठी देणगी आहे असेही एका समीक्षकाने म्हटले आहे.

भाषा ही त्यांच्या कथेची एक जमेची बाजू आहे. त्यांनी वापरलेल्या सोरठी बोलीच्या दमदार मर्दानीपणामुळे व नादमधुरतेमुळे मेघाणी शैलीकार मानले गेले. तथापि तत्कालीन गुजराती साहित्यातील श्रेष्ठ शैलीकारात त्यांची गणना झाली अशातला भाग नाही. अंतरातील संघर्षाचे सखोल व अधिक व्यापक चित्रण करण्याच्या त्यांच्या असमर्थतेपेक्षा भाषेचा अधिक मार्मिक व सूक्ष्म उपयोग करण्याची अक्षमता शैलीकार म्हणून त्यांची योग्यता कमी करण्यास अधिक जबाबदार नसेल ना अशी शंका येते. तरी देखील मेघाणींच्या भाषेने गुजराती कथेत जवळ जवळ मारून टाकण्याइतका टवटवीतपणा आणला हेही तितकेच खरे आहे.

कल्पित कथेत प्रत्यक्ष आयुष्यातील घटना व वस्तुस्थिती घालण्याच्या मेघाणींच्या प्रयत्नाकडेही लक्ष वेधावे लागेल. घडलेल्या गोष्टी कलात्मक रूपात मांडणे जितपत जमले आहे तितपत तो प्रयत्न स्तुतीस पात्र आहे. 'माणसाईना दिवा' व 'जेल ऑफिसनी बारीअेथी' ही या प्रयत्नाची दोन उदाहरणे आहेत. तर 'पलकारा' एका विलायती चलच्चित्रावर आधारित आहे. शिवाय 'माणसाईना दिवा' म्हणजे श्री. रविशंकर महाराज यांच्या दरवडेखोरांच्यासाठी केलेल्या खऱ्या माणुसकीच्या व सर्वांना जवळ घेणाऱ्या कामाचा पुरावा आहे. हा कथासंग्रह म्हणजे प्रत्यक्ष जीवनाचा अर्थ स्पष्ट करण्याचे मेघाणीचे सामर्थ्य प्रस्थापित करणारा दाखला आहे. त्यांच्या इतर कथात ज्या स्थरातील पात्रे आहेत त्याच स्तरातील सोरठमधील नाही पण खेडा जिल्ह्यातील लोकांचे चित्रण ह्यात आहे. याप्रमाणे 'माणसाईना दिवा' हे खेडा जिल्ह्यातील डाकूंच्या आयुष्याची दिशा बदलून टाकणाऱ्या श्री. रविशंकर महाराजांच्या थोर प्रयत्नांचे अविस्मरणीय चित्र आहे. 'जेल ऑफिसनी बारीअेथी' हे कैद्यांच्या मनाचे व विचारांचे यशस्वी चित्रण मेघाणी; स्वत: जेलमध्ये असते तर जितके सच्चे झाले असते तितके सच्चे आहे. समाजाने टाकलेली माणसे असोत वा सामाजिक रूढी असोत, वाईटातून चांगले बाहेर काढणे हा मेघाणींच्या जीवनाचा एक हेतूच असावा असे दिसते. आधी उल्लेखिलेल्या कथा या विधानाची सत्यता पटवतील.

रचनेचा विचार करता मेघाणी फारशी उंची गाठत नाहीत. कलेचा हा लहान, सुबद्ध प्रकार ते कौशल्याने हाताळू शकले नाहीत. आपण हजार कथा हजार परींनी लिहू शकू असे ते म्हणत असले तरी हा आदर्श ते क्वचितच गाठू शकले. त्यांच्या उत्तम कृतीत ते धूमकेतूंचे अनुयायी होते एवढेच म्हणता येईल. तथापि हजार प्रकारच्यां कथारचनेचा संबंध कथाप्रकारांशी नसून कथावस्तूच्या विकासाबद्दलच्या त्यांच्या दृष्टिकोनाशी आहे.

१९७२ साली 'कुसुंबीनो रंग (भाग २) मध्ये मेघाणीच्या फक्त १७ च कथा पुनः प्रकाशित झाल्या. त्यावरून काळाने हेच दाखवून दिले आहे की मेघाणी नाजूक, मार्मिक कलावंत नव्हते परंतु भावनाशील माणसाची ताकद व सामर्थ्य असलेली हिमतीची, धीराची आणि भूतकालावर प्रेम करणारी व्यक्ति होते.

* * *

117027

# समीक्षा

पत्रकारित्व हे जसे मेघाणींच्या कथा कादंबऱ्यांचे उगमस्थान होते त्याच प्रमाणे त्यांच्या समीक्षाशक्तीच्या वापराचे देखील तेच उगम स्थान होते. ' जन्मभूमी ' साठी त्यांनी वर्षानुवर्षे पुस्तक परीक्षणे तसेच साहित्य विषयक व समीक्षात्मक लिखाण केले. या सदराचे शीर्षक ' कलम अने किताब ' होते. हे लेख ' परिभ्रमण ' ( भाग १, २, ३ ) मध्ये संग्रहित केले आहेत. या शिवाय त्यांनी आपल्या मित्रांना ' लिखितंग झवेरचंद मेघाणी ' या सहीने लिहिलेली साहित्यविषयक पत्रे ( भाग १, २, ३ ) व अनेक पुस्तकांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना हे सर्व साहित्यही एकत्र करून प्रकाशित केले आहे. त्यातून साहित्य व साहित्यविषयक समस्या विषयीची त्यांची भूमिका दिसून येते. तथापि लोकसाहित्याच्या साहित्यिक मूल्यासंबंधी त्यांनी केलेले विवेचन हे त्यांचे सर्वात महत्वाचे लिखाण आहे. त्यांची मते जरी फारशी शास्त्र शुद्ध किंवा तात्विक म्हणता येण्यासारखी नसली तरी लोकसाहित्याच्या समीक्षेत त्यांचे योगदान महत्वाचे व पायाशुद्ध आहे. हे म्हणणे योग्य होईल. खरे म्हणजे लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे तयार झालेली त्यांची टीकात्मक मते जितकी रहस्योद्‌घाटक तितकीच स्वतंत्र आहेत.

लेखक म्हणून मेघाणींच्या ज्या मर्यादा आहेत त्यापैकी पत्रकार व्यवसायाची एक गरज ही एक आहे हे दाखवता येईल. रात्रंदिवस साहित्य व साहित्य समीक्षात्मक लेख सर्वसामान्य वाचकासाठी त्यांनी खरोखरीच भरडून काढले. साहजिकच अशा प्रकारच्या लिखाणात सखोल किंवा समतोल टीकात्मक जाणीव बहुधा नसते. परंतु लोकसाहित्यावरच्या समीक्षेचा विचार करता ते वेगळे उठून दिसतात. त्यांच्या लेखसंग्रहातून काही उथळ लिखाण गाळता आले असते असे वाटते. एका समीक्षकाने तर याही पुढे जाऊन ' परिभ्रमण ' हे समीक्षात्मक लेख वाटतच नाहीत असे म्हटले आहे. ' नर्मदा ब्रिज ' किंवा ' कोंबड्याची आश्चर्यकारक कथा ' या सारख्या काही लेखात काहीही औचित्य नाही. आपली मन वळवण्याची शक्ति वाचकाला साहित्याची गोडी लावण्याच्या कारणी लावत येईल तेवढी त्यांनी लावली ही मेघाणींची सर्वात मोठी कामगिरी आहे.

समीक्षासाहित्याचे व समीक्षेचे आपले वाचन मर्यादित होते हे मेघाणींनीच कबूल केले आहे. आघुनिक कवितेसंबंधी आपले काय मत आहे ह्या प्रश्नाला आपल्या सदरातून त्यांनी आपल्याजवळ तेवढा मोठेपणा नसल्यामुळ आपण अभिप्राय देण्याचे धाडस करणार नाही व आपल्या मते तो स्वतःचा अधिकारही नाही असे उत्तर दिले आहे. हा सच्चेपणाचा दृष्टिकोण मेघाणींचा स्वभाव विशेष आहे. त्यांची आयुष्याकडे व साहित्याकडे पहाण्याचीं दृष्टीही अशीच प्रांजल आहे. त्यांच्यात खऱ्या शोधकाची नम्रता आहे. ते आष्युष्यात व साहित्यात शोध घेणारेंच आहेत. आपल्या विषयात व साहित्य वाचनात खोल बुडून जाणारा हा शोधक आहे. वारंवार वाचल्याने होणाऱ्या आनंदासाठी ते साहित्य ग्रंथ पुनः पुनः वाचीत. खऱ्या साहित्य रसिकाप्रमाणेच एक दोनदा वाचून त्यांचे समाधान होत नसे. हे सर्व पाहिल्यानंतर मेघाणीची संवेदनशीलता श्रेष्ठ प्रतीची होती, त्यांचे विचार आणि भावना त्यांना सुस्पष्टपणे जाणवत असत आणि सुस्पष्टपणे अभिव्यक्त होत असत ह्याची नोंद घ्यावयास हवी. जोपासलेली अभिरुची, तीक्ष्ण संवेदन शक्ति, स्पष्ट व सरळ विचारपद्धती व अभिव्यक्ति, साहित्य प्रवृत्तीच्या निश्चित स्वरूपाची कल्पना, मोकळे आणि पूर्वग्रहरहित असे मन ह्या मेघाणीनी साहित्यसमीक्षेसाठी मानलेल्या अनिवार्य अटी आहेत. आणि प्रत्येक टीकाकांराच्या अंगी जे गुण असावेत ते हे नव्हेत असे कोण म्हणू शकेल ?

पत्रकार कितीका मोठा असेना तो साहित्य समीक्षेत उच्च पायरी गाठू शकेल ह्यावर विश्वास ठेवणे बऱ्याच समीक्षकांना कठीण वाटते. आणि साहित्य समीक्षक म्हणून मेघाणी हे फारसे लक्षात येंण्यासारखे नाहीत असे मानले जाण्यामागे ही वृत्ती आहे. उच्च साहित्य मूल्यांना वाहून घेतलेले असणे हे एखाद्या पत्रकाराला अगदी शक्य आहे. समीक्षक म्हणून विशिष्ट परिस्थितीत मेघाणी अधिक उच्च स्तर गाठू शकले असते काय हे ठरविण्यासाठी कसोशीन पुरावा शोधावा लागेल.

याप्रमाणे वृत्तपत्रव्यवसायाचे काही तोटे असले तरी मेघाणीच्या बाबतीत साहित्यसमीक्षेपुरते त्यांचे काही फायदेही आहेत कारण निर्भयता, विचारांची स्पष्टता, शैलीचा सुबोध ताजेपणा हे पत्रकाराचें गुण मेघाणीना समीक्षेत साह्यरूप झाले. ब. क. ठाकोर यांच्या ' म्हारां सॉनेट ' वरील त्यांच्या धाडसी टीकेतून जे अनेकांना वाटत होते पण व्यक्त करण्याची भीति वाटत होती ते निर्भयपणे व्यक्त झाले त्यात नवल नाही.

साहित्य व साहित्यविषक प्रवृत्ति ह्याकडे लोकांचे चित्त वेधणे हे मेघाणीच्या मते समीक्षेचे मुख्य कार्य होते. के. ह. ध्रुव यांच्या व इतरांच्या व्यक्तिचित्रातून ते साहित्यकार जे जीवन जगले, त्यांनी जे लिहिले त्याची सामान्य वाचकांना काहीशी कल्पना द्यावी असा त्यांचा प्रयत्न होता. परदेशी वाङ्मयाची माहिती त्यांनी उपलब्ध करून दिली. मेघाणीनी आपल्या सदरातून साहित्य वाचनाची जी प्रेरणा दिली त्याबद्दल या देशाचे तरूणही त्यांचे ऋणी आहेत.

जाता जाता 'माणसाईना दिवा' बद्दल मेघाणीना मिळालेल्या पारितोषिकाबद्दलच्या वादाचाही उल्लेख करावयास हवा. पुस्तकातील इतर कशापेक्षाही वाङमयीन गुणामुळेच पुरस्कार मिळाला आहे असे मेघाणींना स्वतःला वाटते.

मेघाणीच्या समीक्षेचे दुसरे एक अंग म्हणजे आधुनिक ते सारेच मोलाचे समजून आंधळेपणाने स्वीकारण्याविरुद्ध त्यांनी दिलेला इशारा. संस्कृत प्रचुर बोजड शैलीवर त्यांचा प्रामाणिक रोष होता. तसाच आधुनिक साहित्यात उपयोगल्या जाणाऱ्या प्रसंगांच्या पोकळपणावरही होता. दुर्बोधतेची त्यांना तीव्र नावड होती. साहित्य हे बहुजन समाजासाठी नसून काही थोड्या लोकांसाठी आहे हे त्यांनी साफ नाकारले होते. साहित्याचा पुरवठा करणारे आपणच हा बुद्धिवाद्यांचा दावा त्यांनी धुडकावून लावला होता. साहित्यकृतीचे मूल्यमापन करणारे आपणच हा बुद्धिवाद्यांचा आणि सांस्कृतिक शिष्टांचा दावा त्यांना पोकळ वाटे. परंतु ज्या दुर्बोधतेशी त्यांनी झुंज दिली ती आधुनिक साहित्याच्या पायात अजूनही घोटाळत नाही असे कोण म्हणू शकेल ?

छापखान्यातील जुळारी त्यांच्या लेखांची मुद्रिते जुळवतांना जेव्हा 'वा' म्हणून डोले तेव्हा त्यांना खरोखरीच असे वाटे की बहुजनसमाजाने आपले साहित्य स्वीकारले आहे हे उघड आहे. त्यानी पुढें असेही म्हटले की प्रकाशकाने एखादे पुस्तक नाकारले किंवा जनतेला ते आवडले नाही तर सर्वसामान्य माणसाला आपली कला मान्य नसल्याचा तो पुरावा आहे. त्यांची पुस्तके छापण्यासाठी स्वीकारण्याबाबत अडचण आली असा अनुभव त्यांना कधीच आला नाही. जनतेची मान्यता हे कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाचे गमक नाही हे मान्य केले तरी सामान्य लोकांना कुचकामी साहित्यातून कलाकृति वेगळी निवडून काढता येते हे नाकारता येणार नाही. लोकशाही पद्धतीवरचा व जनतेच्या कलाकृतीबद्दलच्या खऱ्याखुऱ्या जाणकारीवरचा मेघाणींचा विश्वास ह्यामागे

होता. कामुक साहित्यावरील निर्बंध त्यांनी फारसे मानले नाहीत. बरेवाईट ठरवण्याच्या लोकांच्या शक्तीवर त्यांचा विश्वास होता.

असे असून देखील केवळ समकालीन परिस्थितीवर लिहिणारा म्हणून मेघाणी लेखकाला मानीत नसत. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपासून राजकीय व सामाजिक शक्तींचा परिणाम लोकजीवनावर इतका झाला की लेखनाच्या कलात्मकतेकडे फारसे लक्ष न देणाऱ्या लेखकांचे ध्यान त्या शक्तींवरच केन्द्रित झाले. संकुचित अर्थाने कलेसाठी कला म्हणून जरी मेघाणींनी आपल्या कादंबऱ्या लिहिल्या नसल्या तरी साहित्याच्या मूल्यमापनात कलेचे अधिराज्य ते मानीत. व कलेच्या दृष्टीनेच प्रत्येकाच्या कृतिचे मोल ठरवावे. अशी त्यांची अपेक्षा असे. अशा प्रकारे बंगालच्या प्रसिद्ध दुष्काळानंतर लिहिल्या गेलेल्या बंगाली कादंबऱ्याबद्दल बोलताना ते म्हणाले "या कादंबऱ्या समकालीन विषयामुळे लोकांना आवडल्या तरी कलेच्या स्तरावर मनाची पकड घेण्यासारखे त्यात काहीच नाही."

मेघाणीचे मन मोठे होते. जरी भूतकाळाबद्दल त्यांना ओढ होती. तरी गुजराती साहित्य क्षितिजवरच्या डॉ. उमाशंकर, पन्नालाल पटेल, चुनीलाल मडिया ह्यांच्यासारख्या नव्या ताऱ्यांचा स्वीकार करताना त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. त्यांना जे वाटे ते खरेखुरे वाटे. साहित्यातील एखादी गोष्ट त्यांच्या मनाला किंवा अंतःकरणाला जाऊन भिडली की बहुधा त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागत. एखाद्या कलाकृतीच्या गुणावगुणाचे मूल्यमापन करण्याऐवजी ते स्तुतीच करीत. ते म्हणत "कलाकृतीचे नाजूकपणे तोलमाप काढण्याचा मला वकूबच नाही." हा केवळ एक भावनेचा उद्रेक होता. यावर कोणाचा विश्वास बसणार नाही ? त्यांनी मनात आणले असते तर कलाकृतींचे चिकित्सक मूल्यमापन कलात्मकतेच्या कसोटीवर ते करू शकले असते.

तरीही एखाद्या कलाकृतीच्या संदर्भात त्यांचा अभिप्राय ग्राह्य धरला तरी कला व साहित्य ह्यावरील त्यांची सर्वसामान्य मते समाधानकारक वाटण्यासारखी नाहीत. मेघाणी म्हणजे कोणी गाढे विद्वान किंवा मोठे विचारवंत नव्हते. परंतु त्यांना जी कलाकृती वाटे तिच्यासंबंधी वाचकांच्या मनात उत्साह निर्माण करण्याचे त्यांचे सामर्थ्य अप्रतिम आणि सर्वतोपरी प्रशंसनीय होते. त्यांना चांगल्या साहित्याची नैसर्गिक जाण होती. आणि संपादन केलेली अशी एक सौंदर्यदृष्टी होती. साहित्यात त्यांनी जे

पाहिले, जे त्यांना जाणवले व कळले त्या सर्वात ती दिसून येते. त्यांची कलासक्ति प्रांजल होती व त्यांच्या जीवन जाणिवे सारखीच स्पष्ट होती. साहित्यात जे चांगले आहे त्या विषयी त्यानी अनिश्चित विधाने केली नाहीत. आपल्या कितीशा टीकाकारांच्याबद्दल आपल्याला असे म्हणता येईल ?

* * *

# पत्रकारित्व

आधी निर्देश केल्याप्रमाणे पत्रकारित्व हे मेघाणीच्या लिखाणाचे मुख्य क्षेत्र होते. संपादक या नात्याने चालू घडामोडीच्यावर स्वतंत्र, स्पष्ट व प्रामाणिक मते व्यक्त करून जनमत तयार करण्याचे कर्तव्य त्यांनी इमाने इतबारे बजावले. आपल्या लेखनाच्या परिणामासाठी सतत तयारी ठेऊन स्वातंत्र्य–कार्य त्यांनी आपले मानले व आपल्या वाचकांच्या मनात त्यासाठी झुंजण्याची इच्छा निर्माण केली. राणपूरला आपले मुख्य केंन्द्र बनवून त्याकाळी जी देशी राज्ये किंवा संस्थाने म्हणून ओळखली जात तेथील लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत उजळण्यामागे हीच मनोवृत्ति होती. हे काम त्यांनी जीवावर उदार होऊन केले. त्याचबरोबर आपल्या स्वातंत्र्याच्या प्रचारकार्यामुळे शक्यतो कोणाचे नुकसान होऊ नये आणि संस्थानिक किंवा ब्रिटिश ह्यांच्याशी शत्रुत्व येऊ नये ह्याची त्यांनी काळजी घेतली. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात 'जन्मभूमि' 'फुलछाब' आणि 'सौराष्ट्र' ही निर्भय पत्रकारित्वाचा आदर्श उभा करणारी सुरुवातीची वर्तमानपत्रे होती. त्यांनी लोकांना परदेशी सत्तेच्या गुलामगिरीच्य निद्रेतून जागे करून स्वातंत्र्यासाठी लढण्यास उठवले.

मेघाणींची संपादकीय स्फुटे व दैनंदिन घटनांवरील टीका ही स्वातंत्र्यानुकूल लोकमत तयार करण्याची प्रभावी साधने होती. गांधीजी गोलमेज परिषदेस गेले त्या प्रसंगावरील कवितेसारख्या काव्यांचा स्वातंत्र्योपयोगी साधन म्हणूनही ते वेळोवेळी समावेश करीत. खरे म्हणजे लेखक मेघाणीपासून पत्रकार मेघाणी वेगळे काढणे कठीणच. वृत्तपत्र व्यवसाय हा त्यांचा धंदा नसून आवडीचे काम होते. अंत:प्रेरणेने भाग पाडल्यामुळे वृत्त–पत्राचे कार्यक्षेत्र त्यांनी स्वीकारले असावे असे दिसते. कारण त्यामुळे आपल्या स्वत:च्या दु:खांना व व्यक्तिगत आयुष्यातील संघर्षांना गौणपणा आला तरी केवळ त्या कामातूनच लोकांची सेवा करता येईल असा त्यांचा विश्वास होता. लिहावे आणि लिहीत रहावे ही एकच भावना होती. हा एकच विचार, ही एकच कृति मेघाणींना प्रेरणा देणारी होती. असे म्हणणे म्हणजे साहित्य व

पत्रकारित्व यातील भेद जाणण्याची व त्यांच्या मर्यादा ओळखण्याची मेघाणीची शक्ति नाकारणे नव्हे. जाणून बुजून आणि पटले म्हणून त्यांनी पत्रकार होण पसंत केले. परंतु मेघाणीच्यातला कलावंतही तसाच होता. आपली किफायतशीर नोकरी सोडून वृत्तपत्र व्यवसायास वाहून घेताना जसे त्यांनी मागेपुढे पाहिले नाही तसे निव्वळ पत्रकारिता करणे अशक्य वाटताच ती सोडण्यासही त्यांनी अनमान केले नाही. खऱ्या वृत्तपत्रकाराप्रमाणे ढोंग, दंभ व भ्रष्टाचार यांचा त्यांना तिटकारा होता. इतकेच नाही पण कोणत्याही भावनांचा उद्रेक, पूर्वग्रह किंवा पक्षपात वृत्तपत्राशी संबंध असलेल्या कोणात दिसला तेव्हा त्यांनी तीव्रतेने विरोध केला आणि म्हणूनच 'सौराष्ट्र' पत्राचे संपादन करीत असतां या साऱ्यावर मात करणे कठीण आहे असे दिसून येतांच त्यांनी संपादकत्व सोडले व ते साहित्याकडे वळले. अगदी आधुनिक काळात देखील असा स्वतंत्र बाणा ठेवणे पत्रकाराला जड जाते. झपाट्याने बदलणाऱ्या राजकीय वातावरणात संपादकाचे स्वातंत्र्य टिकवून धरणे सोपे नाही. व वृत्तपत्रांचे संचालक आजकाल किती प्रभावीपणे संपादकांच्या स्वतंत्र आवाजाची मुस्कटदाबी करतात याची दुःखद जाणीव आपल्याला आहेच. पारतंत्र्याच्या दिवसातदेखील संस्थानिक व संचालक ह्यांच्या विरुद्ध निर्भय पत्रकार म्हणून उभे ठाकण्याचे मेघाणीचे सामर्थ्य थोर होते ते या संदर्भात कळून येते. स्वतःच्या मवाळ किंवा नीरस लिखाणाचा दोष त्यांनी दुसऱ्यावर ढकलला नाही. तो ते नेहमी स्वतःकडेच घेत.

साहित्यविषयक सदरांचे लेखक म्हणून जसे ते चारणांचे पोवाडे व लोककथा ऐकण्यात बराच वेळ घालवीत तसेच बंगाली व इतर परदेशी साहित्यातून ते सामग्री गोळा करीत. त्यांच्या लिखाणाची चातकाप्रमाणे वाट पहाणाऱ्या व त्यातून प्रेरणा मिळवणाऱ्या सामान्य वाचकांची कल्पनाशक्ति उत्तेजित करण्यासाठी आपल्या सदरातून त्यांनी या सर्वांचा उपयोग केला. त्याचबरोबर निर्भीड वृत्ति, जोडीस अभिव्यक्ती इतकीच निकोप अशी मूल्ये हे मेघाणींच्या पत्रकार म्हणून केलेल्या कामा मागचे प्रेरक गुण आहेत.

आधी दाखवल्याप्रमाणे मेघाणींनी देशाच्या तत्कालीन राजकीय जीवनाची जाणीव निर्माण करण्यासाठी काव्ये व पद्ये ह्यांचा उपयोग केला. सायमन कमिशन असो, जालियनवाला बाग असो किंवा बार्डोली आणि घोलेरा सत्याग्रह किंवा दांडी यात्रा असो—या सर्वांविषयी लिहिताना मेघाणीनी लोकमत, जनतेची दुःखे, त्यांच्या प्रेरणा, त्यांचा हिरमोड हे व्यक्त केले. 'सौराष्ट्र' चे राजकीय अग्रलेख

कै. अमृतलाल शेठ लिहीत परंतु लोकमत तयार करण्याचे, त्याला वळण देण्याचे काम मेघाणीच्या अविचल लेखणीवरच सोपवलेले होते. एकूण मेघाणी त्यावेळच्या राजकारणापासून अलिप्त राहू शकले नाहीत. परंतु राजकीय घडामोडीबद्दल आपल्या साहित्यिक आत्म्याला मोकळेपणाने लिहिता यावे ह्यासाठी ते वरची पातळीही नेहमी गाठू शकत.

वृत्तपत्रव्यवसायाचा परिणाम मेघाणीच्या लिखाणावर झाला हे कबूल करावे लागेल. पण त्याबरोबरच 'सौराष्ट्र' 'फुलछाब' 'उर्मि' या पत्रातील त्यांच्या कथा, कादंबऱ्या व स्वभावचित्रांना त्यांनी साहित्याचा मुलामा चढवून साहित्यिक वजन व मूल्य दिले हेहि मानावे लागेल. 'माणसाईना दिवा' व 'जेल ऑफिसनी बारीअेथी'. ही याची उदाहरणे आहेत.

शेवटी मेघाणी हे पत्रकार हा सत्यशोधक, अंगमहेनतीची आवड असणारा, स्वार्थत्यागी, जीवनमूल्यांना जपणारा व ती पुढे आणणारा लोकशिक्षक असावा असे मानणारे आदर्श पत्रकार होते. पत्रकार म्हणून त्यांची सर्वात मोठी कामगिरी केवळ त्यांच्या साहित्याला मिळालेल्या गतीतच दिसत नसून लोकमताला वळण देण्यात त्यांना मिळालेल्या यशातही दिसून येते. जनतेला जागृत करता यावे, स्वतःच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या समस्यांची तिला जाणीव करून देता यावी. त्यावर चर्चा करून त्या सोडवण्याकरता काम करण्यासाठी तिला उद्युक्त करता यावे—एका पत्रकाराची इच्छा याहून अधिक ती काय असू शकेल? सतत नाहीशा होणाऱ्या वृत्तपत्राच्या जगात याहून अधिक मिळवता तरी काय येणार? हे सारे मिळवण्यात मेघाणी सफल झाले. हा वृत्तपत्रकार म्हणून असलेल्या त्यांच्या प्रतिभेचा पुरावा आहे.

* * *

# लोकसाहित्य ( संपादन व संशोधन )

लोकसाहित्याच्या संग्रहाचे व संपादनाचे श्रेय मेघाणींचे असले तरी गुजरातच्या व सौराष्ट्राच्या लोकसाहित्याकडे प्रारंभी लक्ष वेधले ते एका पारशी सद्‌गृहस्थाने, त्यांच्यामागून रणजितराम वावाभाई महेतांनी व इतरांनी लोकसाहित्य जमवण्यात रस घेतला. 'सौराष्ट्रनी रसधार' च्या प्रस्तावनेत मेघाणींनी याची नोंद घेतली आहे. परंतु उच्चभ्रू लोकांच्या पूर्वग्रहामुळे दडपल्या गेलेल्या समग्र लोकसाहित्याच्या परंपरेची जाण व रसग्रहण ह्यांचे पुनरज्जीवन करण्याचे काम मेघाणींनी मिशनरी उत्साहाने केले. त्यांनी बऱ्याच कथा, काव्ये, गाणी शोधून काढली. आणि ह्यात असलेले लेखक, संग्राहक किंवा गायक यांना भेटून त्याची नोंद केली. लोकसाहित्य हा मेघाणींचा धर्मच झाला असे म्हणता येईल व एखाद्या साधकाच्या तळमळीने त्यांनी त्या कामाला वाहून घेतले.

विश्वविद्यालय व संशोधक ह्यांना त्यांनी दिलेली ती आर्त हाक होती. ते म्हणाले की, 'सौराष्ट्रातील भिल्ल, नाखवे व इतर अनेक मागास वर्गीय ह्यांच्या रीतिभाती, रूढी व राजकीय पद्धती ह्यांचा खोलवर शोध घेण्याचा आपण शक्य तेवढा प्रयत्न केला. ( गुजरातच्या वेगवेगळ्या भागातून या लोकांचे साहित्य गोळा करावे अशी आपली महत्वाकांक्षा होती ) परंतु ते काम आपण पूर्णपणे तडीस नेऊं शकलो नाही याबद्दल अतिशय खंत बाळगून विश्वविद्यालयान लोकसाहित्याची ही मशाल गुजरातभर प्रज्वलित ठेवावी अशी आपण व्याकुळतेने विनंती करीत आहो.' मेघाणीनी सुरू केलेल्या कामात पुढे फारच थोडी भर पडली. हे स्पष्टपणे कबूल करावे लागेल. मदतीशिवाय एका हाती, प्रतिकूल परिस्थितीत लोकसाहित्य जमवण्यासाठी कष्ट करण्यात त्यांनी काही बाकी ठेवले नाही. आज टेपरेकॉर्डर, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनची अनुदाने, युनिव्हर्सिटीच्याकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या, आणि काय नाही—अशी सारी मदत हाताशी असून देखील लोकसाहित्यावरचे काम जवळ जवळ जेथल्या तेथेच आहे याची टीकात्मक नोंद घ्यावी लागणे खेदजनक आहे. मेघाणीच्या कामामागचे चैतन्य तसेच अपुरे राहिले यात नवल नाही.

मेघाणीच्यामुळे जे काही टिकून राहिले ते इतके मौल्यवान आहे, लोकांच्या मनावर व अंतःकरणावर प्रकाश टाकणारे व त्यांना समजून घेण्यासाठी पाया घालू शकणारे आहे. त्यावद्दल आपण मेघाणींचे आभार मानले पाहिजेत. मौखिक साहित्य हे लिखित साहित्याच्या आधी अस्तित्वात येते. आणि प्राथमिक व नागरी संस्कारांपूर्वीचे मन व अंतःकरण समजून घेण्यासाठी मौखिक पुरावा गोळा करणें हा कोठलाही देशाच्या साहित्यिक अथवा सामाजिक विकासाचा पाया असतो. या प्रकारचा अभ्यास पौर्वात्य साहित्यात रस असलेल्या पाश्चिमात्य विद्वानांच्या कामामुळे अस्तित्वात आला. वेगवेगळ्या देशांच्या लोकसाहित्याच्या अभ्यासातून लोकांच्या सामान्य भावभावना, सामान्य दुःखे व त्यातून काढलेले सामान्य मार्ग उघड होतील. गुजरातच्या काही लोककथा व जर्मनी म्हणा किंवा पूर्व यूरोप म्हणा ह्यातील काही लोककथांत साम्य शोधता येईल. लोकांनी एका देशातून दुसऱ्या देशात केलेल्या स्थलांतराचा हा परिणाम असावा किंवा वैचारिक व व्यापारी दळणवळणाचा परिणाम असावा.

१९ व्या शतकात सुरु झालेल्या साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासामुळ तौलनिक भाषा शास्त्राचा व त्याद्वारे वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या मनाचा व सवयीचा शोध घेण्याचा पाया घातला गेला. वेगवेगळ्या देशांच्या लोकसाहित्याच्या प्रकाशनामुळे ज्यांचे साहित्य प्रकाशित झाले त्या लोकांच्या विषयांचे, हेतूंचे व मनोव्यापारांचे पृथक्करण करण्यासही सुरुवात झाली. स्टिथटॉम्पसन यांनी जागतिक पायावर या सर्वाची माहिती देणारा ज्ञान कोशासारखा ग्रंथ तयार केला.

लोक साहित्यासाठी मेघाणींनी केलेले काम कमी न लेखले तरी त्यांचे कार्य म्हणजे योग्य दिशेने टाकलेले फक्त पहिले पाऊल आहे हेही खरे आहे. मेघाणींनी जे जमवले आहे त्याचा विद्वानांनी शास्त्रीय पायावर अभ्यास करीपर्यंत केवळ साहित्य गोळा करणे याला फारसा अर्थ नाही. आधुनिक तरुण माणसाला गाणी, कविता वगैरे गोळा करण्यासाठी समाजाच्या खालच्या स्तराबरोबर रहाणे कदाचित कठीण वाटेल. तसेच मेघाणींनी जे काही लोकगीतांचे संपादन केले आहे त्यात दिसून येते त्याप्रमाणे अशिक्षित लोकांशी जवळिक साधून त्यांच्यातला सद्भाव, त्यांच्या आकांक्षा, त्यांच्या शंका व त्यांचे प्रेम उघड करावयास लावणेही अवघड जाईल. उदाहरणार्थ पुढील कवितेतील विपुल रंग, मुबलक भाव, प्रतीके आणि कल्पना वैभव विषय परिपोषाच्या प्रत्येक

टप्यावर उलगडत जाणारे आहे. परोक्ष व प्रत्यक्ष प्रतीकातून सासूने केलेल्या नववधूच्या हत्येच्या संकेतातून उठणारा भावनांचा कल्लोळ हा या कवितेतील सौंदर्याचा एक भाग आहे. शब्दात मूर्तरुप पावलेल्या यातना व मर्मभेदकता अमाप आहेत. बारा वर्षाहून अधिक काळाच्या विरहानंतर पतीने—पत्नीचा घेतलेला शोध स्थानिक आणि तरीही परिणामकारक प्रतीकातून सूचित केला गेला आहे. काव्याच्या सौंदर्यात वृत्ताने आपल्या स्वतःच्या सामर्थ्याची भर घातली आहे. त्याचप्रमाणे शब्दांच्या निवडीनेही तेच केले आहे. अशा प्रकारे आणखी विश्लेषण करीत जाता येईल. परंतु त्यांचा लोककाव्यांचा संग्रह साधारण माणसांचे असाधारण परिस्थितीतील मन व अंतःकरण उघड करण्याच्या दृष्टीने किती परिणामकारक आहे हे दाखवण्यास ही कविता एक उदाहरण आहे एवढे दाखवले तरी पुरेसे आहे.

## नो दीठी

माडी ! बार बार वरसे आवीयो,
माडी ! नो दीठी पातळी परमार्य रे जाडेजी मा !
मोलुं मां दीवो शग वळे रे,
दीकरा ! हेठो बेसीने हथियार छोडच रे कलैया कुंवर !
पाणी भरीने हमणां आवशे रे
माडी ! कूवा ने वाव्यु जोई वळचो रे,
माडी ! नो दीठी पातळी परमार्य रे, जाडेजी मा !
मोलुंमां दीवो शगे बळे रे
दीकरा ! हेठो बेसीने हथियार छोडय रे कलैयां कुंवर !
दळणां दळीने हमणां आवशे रे,
माडी ! घंटीयुं ने रथडा जोई वळचो रे,
माडी ! नो दीठी पातळी परमार्य रे जाडेजी मा !
दीकरा ! हेठो बेसीने हथियार छोडच रे कलैया कुंवर !
धान खांडीने हमणां आवशे रे,
माडी ! खारणिया खारणिया जोई वळचो रे,
माडी ! नो दीठी पातळी परमार्य रे जाडेजी मा !
मोलुंमां दीवो शगे बळे रे
दीकरा ! हेठो बेसीने हथियार छोडच रे, कलैया कुंवर !

घोण्युं धोईने हमणां आवशे रे,
माडी ! नदीयुं ने नेरां जोई वळचो रे,
माडी ! नो दीठी पातळी परमार्य रे जाडेजी मा !
मोलुमां दीवो शगे वळेरे
अेना वचकामां कोरी वांधणी रे,
अेनी वांधणी देखीने वावो थाउं रे गोझारण मा !
मोलुंमां आंवो मोडीयो रे
अेना वचकामां कोरी टीलडी रे,
अेनी टीलडी ताजीने तरसूळ ताणुं रे गोझारण मा !
मोलुंमां आंवो मोडीयो रे

## नाही मी पाहिली

माय गे ! बारा बारा वर्षांनी आलो मी घरी
सुकुमारी कोठे नाहीं गं दिसली परमार नारी
माडीत दिवा संथ तेवतो.
लेकरा माझ्या ! सोड ती हत्यारे. वैस ना जरी
येईल आतां. पाण्याला गेली घरनारी.
माय गे ! येतांना पाहिल्या वावडचा विहीरी
जाडेजी मा ! नाहीं मी पाहिली परमार नारी
माडीत दिवा संथ तेवतो.
लाडक्या लेकरा ! सोड ती हत्यारे. वैस ना जरी
दळण दळून येईल ती नारी
जाडेजी मा ! घरघरणारी जाती सारी मी शोधली
सुकुमारी परमार नारी नाही मी पाहिली
माडीत दिवा संथ तेवतो
लाडक्या लेकरा ! सोड ती हत्यारे टेक ना जरी
कांडणे करून येईल ती घरी.
जाडेजी मा ! उखळे पाहून आलो मी सारी
सुकुमारी कोठे नाही गं दिसली परमार नारी.
माडीत दिवा संथ तेवतो.
लाडक्या लेकरा ! सोड ती हत्यारे. वैस रे जरा

घुणे धुवून येईल ती घरा
जाडेजी मा ! नदी, तळी सारी धुंडून झाली
सुकुमार नारी नाहीं कोठेही पाहिली
माडीत दिवा संथ तेवतो.
तिच्या वोचक्यात **अष्टपुत्री कोरी**
कोऱ्याच घडया, तशाच साडया. कसा करू मी संसार ? *
सूडकरी माये ! माडीत मुरगळे **आंब्याचा अंकूर**
घालीन डोक्यात राख–तिची सौभाग्य कोयरी
ताणीतो भाळीं त्रिपूंड् माये ! झालीस सूडकरी
माडीत मोडले आंब्याचे अंकूर

---

* 'जाडेजा' व 'परमार' ही आई व पत्नी यांच्या कुळाचीं, माहेरची आडनांवे अधोरेखित शब्दातून शील, पावित्र्य व विश्वास व्यक्त केला आहे. पत्नीचा खून केलेला आहे. तथापि दिवा मात्र संथ तेवतो आहे. या प्रतिकाद्वारे जे दिसते त्याहून अंधारात लपलेले किती वेगळे असू शकते हे सूचित केलेले आहे.

* * *

# लोकसाहित्य

मेघाणींच्या लोकसाहित्याचे तीन भाग पाडता येतील. १) कथा व गीते २) सर्जनात्मक साहित्य ३) समीक्षात्मक. पैकी कथा व गीते वस्तुतः ऐकली त्याच रूपात त्यांनी रुजू केली. हे असायला हवे तसेच आहे. कारण साहित्य घेतले त्याच रूपात सादर करणे लोकमानसाच्या अभ्यासासाठी अधिक उपयुक्त असते. संग्राहकाने कोठलाही भाग गाळणे वा त्यात काही भर घालणे हे कलात्मक सौंदर्याच्या दृष्टीने कदाचित ग्राह्य असले तरी लोकसाहित्यात प्रकट झालेल्या विचारांच्या व भावनांच्या अभ्यासाला ते मूलतः हानिकारक असते. या रचना म्हणजे लोकमानसाची गुपिते उकलण्याची खरीखुरी चावी आहे. म्हणून आधुनिक मनाला जास्त कलापूर्ण वाटले असते तरी काहीही न करता किंवा संपादित न करता ही गीते व कथा जशाच्या तशा आपल्यापुढे ठेवल्या याचे श्रेय मेघाणींना दिले पाहिजे. ते खऱ्या अर्थाने लोकांच्या साहित्याचे खरेखुरे संग्राहक आहेत. त्यांचे लोकगीत संग्रह याप्रमाणे आहेत :– 'रढियाळी रात' भाग १ ते ४, 'चुंदडी' भाग १–२. 'ॠतुगीतो,' 'सोरठी संतवाणी,' 'हालरडां,' 'सोरठी गीत कथाओ,' आणि 'सोरठने तीरे तीरे' सुमारे ७७० गीते याप्रमाणे विस्मृतीच्या गर्तेतून वाचवून ज्यांना आवड असेल त्यांना सहज आस्वाद घेता येईल अशा प्रकारे ह्यात संग्रहित केली आहेत. मेघाणींचा लोकगीतांचा संग्रह म्हणजे अत्यंत समृद्ध आनंदाचा खजिनाच आहे. येथे लग्नगीते, न जुळलेंली स्वभाव वैशिष्टये, वेगवेगळया प्रकारची लोकजीवनाचे विविध पैलू व्यक्त करणारी 'रासगीते' सामोरी येतील. दुर्दैवाने गुजराती विद्वानांनीं त्यावर पुढे संशोधन करण्याच्या शक्यतेकडे लक्ष पुरविले नाही. अशा प्रकारे मेघाणींनी अतिशय कष्ट करून आपल्यासाठी मागे ठेवलेल्या या सोन्याच्या खाणीचा लाभ घेण्यास ते चुकले. मेघाणींच्या स्वतःच्या प्रतिपादनाच्या आधारे या गीतांचे वेगवेगळया प्रकारात वर्गीकरण करणे कठीण आहे. परंतु गुजरात मधील विश्वविद्यालयांनी या गीतांच्या अभ्यासाचा पाठपुरावा करून, त्यातील उत्तम गीते निवडून त्यावर शास्त्रशुद्ध टिपा देऊन त्या सर्वांचा एक संग्रह प्रकाशित करावा अशी वेळ येऊन ठेपली आहे.

लोकगीते व लोककाव्ये यांच्या संपादनातील शास्त्रीय पद्धतीची मदत लोककथांच्या संपादनात घेतली गेलेली नाही. या कथांच्या बाबतीत लोकांचा उत्साह वाढवून त्या लोकप्रिय करण्याची मेघाणीची इच्छा काही अंशी त्यामागे आहे. 'कंकावटी' भाग १–२ व 'दादाजीनी वातो' हे अपवाद सोडून इतर बहुतेक कथांवर त्यांनी या ना त्या प्रकारे संस्कार केलेले आहेत. हे म्हणण्यामागे संपादनातील दोष दाखवायचा नसून लोककथांच्या संपादनातील शास्त्रीयतेचा अभाव दाखवायचा आहे. या संग्रहामुळे मेघाणी हे लोकसाहित्याचे केवळ संग्राहक व संपादक ठरले. त्याचें हे कारण आहे. 'सौराष्ट्रनी रसधार' भाग १ ते ५ 'सोरठी बहारवटीया' 'सोरठी संतो' 'रंग छे बारोट' आणि 'पुरातन ज्योत' हे त्यांचे प्रसिद्ध लोकसाहित्य संग्रह आहेत. वाचकाला एका बैठकीत संपवावेसे वाटावे इतके स्वारस्य कितीही काळ वाटत राहील असे हे लिखाण आहे. मेघाणीच्या कथाकथन कलेच्या सर्वश्रेष्ठतेचा हाच पुरावा आहे. चारण व भाट यांच्या भाषेतच असा एक जोम, स्पष्टता, सामर्थ्य, संगीत आणि गोडवा आहे की ऐकता क्षणी माणूस तिच्याकडे खेचला जातो.

मर्दानी प्रेमाच्या कहाण्या केवळ हरवून जाऊं नयेत म्हणून जमा केलेल्या नसून लोकांच्या जीवनातील मर्दानी जोश टिकावा म्हणूनही त्यांचे जतन केले गेले आहे. भूतकाळाबद्दलच्या प्रेमाला उत्तेजन मिळावे व त्या प्रदेशातील तरुणांना ताठ मानेने राहून घेतल्या कामास वाहून घेण्यास लावावे हाही त्यात हेतू होता. मृदुभाषी, तराजू तोलणाऱ्या, दैववादावर प्रेम करणाऱ्या, पराक्रमापासून दूर रहाणाऱ्या गुजराती प्रजेत धैर्य व जोश निर्माण करण्याचे त्या कथा नमुनेदार साधन ठरल्या.

मेघाणी हे डाकूंबद्दलच्या माहितीचे सच्चे प्रसारक होते. जरी ह्या डाकूंच्या जीवनातून आणि कथातून त्यांनी निखळ इतिहास दिला नसला तरी त्यांच्या संबधीचे संशोधन हे त्यांच्या लेखी जीनवातील एक ध्येय होते. ते आपल्यापुढे रुजू करतात ती या डाकूंच्या जीवनातील घटना, परिस्थिती व झुंज यांची त्या त्या संदर्भातली त्यांच्या तोंडच्या शब्दांच्या आधारे केलेली कल्पनानिष्ठ पुनर्रचना. मात्र कोठलीही व्यक्ति कल्पनेने निर्मिलेली, कोठलीही परिस्थिती कृत्रिमपणे घडवलेली किंवा कोणतेही कृत्रिम मूल्य लादलेले असे या कथातून नसावे अशी खबरदारी मेघाणींनी घेतली आहे. सत्य व कल्पित वेगळे काढणे कधी कधी कठीण जाते. परंतु एकंदरीत या कथा जमवतांना भारावून गेलेल्या संपादकाला जेवढा शक्य होता तेवढा प्रामाणिकपणा त्यांनी

राखला आहे. डाकूंच्याकडून त्रास होत असून देखील त्यांनी त्यांच्यातल्या मर्दुमकीची जवळजवळ भक्तीच केली व सौराष्ट्रातील डोंगर दऱ्या, नद्या आणि नाले ह्यांच्यासारखेच डाकूंचेही त्यांच्या व्यक्तित्त्वाला लोहचुंबकासारखे आकर्षण होते. हा मेघाणींना केवढा मानाचा अहेर आहे.

नंतर येते लोकसाहित्याची समीक्षा. त्यांच्या समीक्षात्मकग्रंथात 'लोकसाहित्य' 'लोकसाहित्य–पगदंडीनो पंथ' 'चारणो अने चारणी साहित्य' 'धरतीनुं धावण' आणि लोकसाहित्यनुं समालोचन ह्यांचा समावेश होतो. लोकसाहित्याच्या संशोधनासाठी आवश्यक तो तपशील मेघाणींनी 'सौराष्ट्रना खंडेरोमां' व 'परिक्रमा'मधे दिला आहे. ही पुस्तके मेघाणींनी एका हाती जमा केलेल्या लोकसाहित्याच्या धनाचे प्रतिनिधित्व करतात. लोकसाहित्यावरील टीका व त्यासाठी अनुसरावयाच्या पद्धति 'लोकसाहित्यनुं समालोचन' मधे दिल्या आहेत ते त्यांच्या विचारांचे सर्वोत्तम सार आहे त्यांची लोकसाहित्याबद्दलची भूमिका त्यांच्या काव्यसंग्रहांच्या काही प्रस्तावनाधेही आढळते.

लोकसाहित्याच्या पद्धतशीर अभ्यासाचा प्रारंभ करण्याचे श्रेय मेघाणींच्याकडे जाते. त्यांच्या आधी झालेले काम फारच मर्यादित व किरकोळ होते. त्यांनी ह्या साहित्याची सखोल पाहणी केली इतकेच नाही तर सामान्य वाचकाला अधिक स्पष्टपणे कळावा असा त्याचा अर्थ काढण्यात ते सफळ झाले. तसेच सामान्य माणसाला तो केवळ जिज्ञासेचा नाही परंतु प्रेमाचा विषय वाटावा असे करण्यात त्यांना यश मिळाले वस्तुतः त्यांच्या सर्वच लेखनातून लोकसाहित्यात दडलेली भांडारे उघडली गेली आहेत. खेड्यातील लोक साहजिकच मेघाणीच्याकडे जात. कारण ते त्यांचे जाणते मित्र व मार्गदर्शक होते. संस्कृतीचा प्रवेश न झालेल्या प्रदेशात त्यांना मेघाणींचा आधार वाटे. राणपूरच्या छापखान्यातील गवंडी, गावच्या हिरवळीवर गाई राखणारा गुराखी, जुळाऱ्याची म्हातारी आई किंवा हडाळयाचे दरबार वाजसुरवाळा आणि असेच इतर अनेकजण मेघाणीच्या साहित्य संचयाची जिवंत उगमस्थाने होती.

लोककवीचा प्रवास लांबचा आणि कष्टाचा असतो तो अनेक वाटा तुडवतो आणि अनेक संकटे सहन करतो. मेघाणींना प्रवासाचें कधी अजीर्ण झाले नाहीं. आणि त्यांच्यातला मनोराज्यात रमणारा कवि पुढे आणि मागे पहात जीवनातील सुख दुःखाची गाणी गात राहिला. जीवनाच्या वेदीवर सर्वस्व वाहणाऱ्या लोकांच्या बरोबर, त्यांच्या काळात जाऊन ते जगले. या जुन्या शूर माणसांच्या मूल्यांचें

मानानें जतन करण्यासाठी मेघाणींनी खूप केले आहे. परंतु बरेच करावयाचें बाकी आहे. आपण आशा करूया की गुजरातमधें केव्हातरी कोठेतरी असा पुरुष अवतरेल की जो ही लोकसाहित्याची मशाल पुढे नेऊन देशाच्या कोनाकोपऱ्यात पोंचवील आणि गुजरातला देशाच्या इतर भागातील लोकसाहित्य उपलब्ध करून देईल. ज्याच्या योगाने पुन: एकदा या देशातील संस्कृतींच्या विविधतेतूंन लोकांच्या ऐक्याची खरीखुरी पुन:प्रस्थापना आपण करू शकू. त्या दिवशी आज देत आहोत तशीच वैभवशाली मानवंदना स्वातंत्र्य आंदोलनाचें राष्ट्रीय प्रतीक झालेल्या लोकशाहीर मेघाणींना पुन: देऊ. स्यातंत्र्य हे जनतेच्या केवळ राजकीय मुक्तीत नसते तर तिच्या आत्म्याच्या मुक्तीत असते आणि या विशाल जगात लोकांच्या आत्म्याचा शोध त्यांच्या लोकसाहित्या खेरीज दुसऱ्या कोठून घेता येईल?

* * *

# दस्तऐवज

तो राजवंशी रजपूत तरुण डोक्यावर आकाश कोसळल्यासारखा हतवुद्ध झाला. त्याच्या सासुरवाडीहून निरोप आला होता, ' हजार रुपये नगद घेऊन ज्येष्ठ शुद्ध द्वितियेला मांडवात या. हा मुहूर्त साधला नाही तर तृतियेला मुलीचे लग्न दुसऱ्याशी लावावे लागेल. '

चिठ्ठी वाचून त्याचा जीव गलवलून गेला. कळायला लागल्यापासून धुळीत एकमेकाशी खेळलो. त्यानंतर तारुण्याच्या उंबरठ्यावरून एकमेकांचेच चिंतन केले, एकमेकांची स्वप्ने रंगवली—ती राजवा. तिचे दुसऱ्याशी लग्न ? आईबापाविना पोरक्या झालेल्या त्या रजपुताला आशा होती—आज ना उद्या हेही दिवस जातील, आपल्या या ओसाड पडलेल्या घरात घरची लक्ष्मी सोन्याच्या पावलाने एक दिवस येईल. कळा गेलेली भांडीकुंडी तिचा हात फिरला की परत पहिल्यासारखी लखलखीत होतील. ती आपल्या माहेरूनही पेटी भरून चीजवस्तू आणील. आणि मामाजी मलाही अहेर करतीलच कीं— पण आज ती चिठ्ठी आली नी आशेची ती सारी रंगीत स्वप्ने क्षणात धुळीला मिळाली. पूर्वजांचे गरम रक्त त्याच्या नसानसातून उकळू लागले मस्तकात घणाचे घाव पडू लागले. राजवा माझी वायको. तिला दुसऱ्याच्या वोहल्यावर चढवण्याच्या गोष्टी ? मी एवढा मोठा जिवंत असताना ? असल्या मेल्या जिण्यापेक्षा मरणं काय वाईट ? पण लाख हवे असले तरी इच्छा मरण देखील मिळायला हवे ना ! लढाई मारावी म्हटले तरी गंजलेल्या तलवारीला धार लावून घेण्याइतक्या दमडयादेखील गाठीला नव्हत्या !

ज्या सावकाराकडे त्याची जहागिरी गहाण होती त्याच्या दाराशी जाण्याखेरीज दुसरा मार्गच सुचेना. त्याच्याकडे जाऊन त्याची पायधरणी करून लाचार झालेल्या त्या रजपुताने गयावया केल्या ' काका, यावेळी माझी लाज राखा, माझी घरधनीण गमावायची वेळ आली आहे. वीष खाऊन मेलो तरी अब्रू परी अब्रू जाईल, घराण्याचं नांव जाईल. तुमचे हजार रुपये मोल मजुरी करून मी परत फेडीन या जन्मी नाही फिटले तर पुनः जन्म घेऊन फेडीन. '

सावकार अशा 'जन्मोजन्मीच्या' हिशोवाच्या भानगडीत थोडाच पडतो? तो काही केल्या दाद देईना. पण रजपूत फारच गळी पडला तेव्हा त्याने एका कागदावर चार शब्द लिहून त्याच्या हाती दिला.

"हं. कर याच्यावर सही. आमचं काय व्हायचं असेल ते होवो!"

रजपुताने तो कागद घेऊन त्यावर नजर फिरवली. एकच वाक्य. "हजाराचे देणे फिटे तो रजपुताणीला आई–वहीण समजेन."

त्याने त्या कागदावर सही केली. त्या दस्तऐवजाची नक्कल आणि हजार रुपये नगद घेऊन तो सरळ सासुरवाडीला जाऊन पोचला.

तिकडे राजवादेखील रात्रंदिवस त्याच्याचसाठी झुरत होती. आपल्या गरीब कंथाचे चित्र डोळ्यापुढून हलत नव्हते. माहेर घरी चित्त लागत नव्हतें. स्वतःच्या सत्तेच्या घराची ओढ लागली होती.

ज्येष्ठाची पहिली द्वितीया उजाडली. वाड्याच्या ओटीवर गावातली चार प्रतिष्ठित माणसे जमली होती. त्यांच्या देखत त्याने सासऱ्यापुढे खण्खण् हजार रुपयांचा ढीग घातला.

"मामा ! हे तुमचे रुपये."

तेथे वसलेल्या साऱ्यांच्या ध्यानात आले. स्थिती खालावलेल्या त्या तरुणाला 'मामा'ने वीष खायची वेळ आणली होती. तिरस्काराने सारी माणसे तट्कन उठून पाठ फिरवून चालती झाली. सासुरवाडीच्या माणसांची तोंडे काळवंडून गेली. कोपऱ्यांत तोंड लपवून रडणाऱ्या राजवाने धसका घेतला कीं हा सारा राग आतां आपल्यावरच निघणार !

– २ –

सासुरवाडीच्या रस्त्यावरच्या बोरीबाभळींना अखेरचा राम राम ठोकून रजपुताणीला घेऊन रजपूत आपल्या घरी परतला. राजबाने पाहिले तो घरावर जशी स्मशानाची कळा आली होती. आजवर पायाला धूळ कशी ती माहीत नसलेल्या राजबाने पदर बांधला. हातात केरसुणी घेतली. सासू, सासरा, दीर, जावा, नणंदा कोणीच नसलेले ते सासरघर ! तिचा सुलक्षणी हात फिरू

लागला नी त्या घराला परत पहिली कळा चढूं लागली. पंचवीस तीस वर्षा-पूर्वी सासूने आरसे लावून भरलेले चांदवे तिने झाडून झटकून भिंतीवर टांगले. खोल्या खोल्यांतून शेकडो आरशांची भिंगे लकाकू लागली.

रात्र पडली. पाट मांडून तिने पतीचे पान वाढले. पोतीने गुंफलेला पंखा माहेरून आणला होता. तो काढून त्याला वारा घालीत जेवूं घातले. तो खालच्या मानेने निमूट जेवून उठला. अकोल्याच्या नरम कापसाने भरलेली रेशमी गादी राजवाने बरोबर आणली होती ती खाटेवर पसरली. एरंडेलाची मंद पणती लावून ती धन्याची वाट पहात बसली. तो आला. त्या गादीच्या मधोमध आपली तलवार उपसून ठेवली आणि भिंतीकडे तोंड फिरवून झोपी गेला. बऱ्याच वेळाने तलवारीच्या दुसऱ्याबाजूला थकल्याभागल्या राजवानेही अंग टेकले.

दोघांच्या मधे होती एक तलवार. दोन ध्रुवाएवढे न संपणारे अंतर! प्रत्येक रात्री हेच. दिवसा कधी नजरेला नजर भेटली तर प्रेम ओसंडे पण रात्र पडली की ती तलवार मधे येऊन पडे. राजवाला याचा अर्थ कळेना. एरवी आपल्यावर राग असल्याचे एकही चिन्ह नाही. कठोर शब्द नाही—टोमण नाहीत. आदळ आपट काहीच नाही. मग रात्रीच हे काय? माझी कसोटी पहाणं चाललंय? की कसलं मंत्र साधन? की—की काही कमीच आहे यांच्यात? ती अगदी गोंधळून गेली. पक्वान्नाचा घास भुकेल्या ओठापर्यंत आल्या आल्या परत जात होता!

एकामागून एक तीन रात्री गेल्या. चौथ्या रात्री तो आला रोजच्यासारखी ती तलवार मधे ठेवलीं. गादीवर अंग टाकलें. पण राजवा झोपली नाही. ती त्या खाटेजवळही गेली नाही. भिंतीला टेकून मेणाच्या पुतळीसारखी एकटक पहात मुकाट्याने उभी राहिली मध्यरात्र उलटली तरी ती आपली तशीच उभी होती.

ठाकोराच्या ते ध्यानात आलें. कुशी फिरवून त्याने विचारले "उभी का अशी?"

राजवाच्या डोळ्यातून गंगायमुना वाहू लागल्या.

"कां? माहेरची सय आली?" त्याने परत विचारले.

"फार झालं हे ठाकोर!" ती भरल्या आवाजाने म्हणाली.

"माहेरच्यांचा राग माझ्यावर किती दिवस काढणार असा?"

"म्हणायचंय् तरी काय तुला?"

"दुसरं काय म्हणू? आपण रजपूत आहात तशी मीही रजपुताणी आहे. जन्मभर तलवार मघे ठेवलीत तरी अक्षर नाही बोलायची."

"मग? आता हे काय चाललंय?"

"फक्त त्याच्यामागचं कारण सांगावं. मी कोठे आडवी येत असेन तर दूर होईन."

"कारण? हे पहा कारण." त्याने सावकाराला दिलेल्या लेखाची नक्कल काढून तिच्या हातावर ठेवली.

चिठी उघडून वाचतां वाचता तेलात भिजलेल्या वातीसारखा तिचा चेहरा उजळला.

"वा! धन्य तुमची जन्मदात्री ठाकोर!....काही हरकत नाही..." ती उद्गारली.

## ३

गांवातल्या चावडीवर बसून बसून कंटाळलेला ठाकोर दोन प्रहरी घोटभर ताक तरी घ्यावे म्हणून घराकडे परतला. स्वतः हौशीने गुंफलेल्या पोतीच्या पंख्याने वांरा घालीत राजबा त्याच्या बाजूला बसून म्हणाली,

"हे असं किती दिवस बसून रहायचं?"

"मग काय करूं? उठावशा काढूं?" तो त्रासून म्हणाला "हे घ्या." एक मणीमंगळसूत्र बाजूला ठेवून बाकीचे सारें दागदागिने अंगावरून काढून राजबाने त्याच्यापुढे ठेवले, त्याकडे पहात तो म्हणाला,

"याचं काय करूं? विकून कर्ज फेडूं? बस? नाही धरवत धीर?... पण म्हणून काय बायकोचे किडूकमिडूक विकून व्रत पुरे करूं?"

" पण माझं पुरतं ऐकून तर घ्याल ? हे सारे देऊन बदल्यात दोन चांगले घोडे, दोघांसांठी दोन दोन जोड्या पोषाख आणि हत्यारं आणावीत. "

" दोघं कोण ? "

" आपण. एक जोडी आपल्यासाठी नी एक माझ्यासाठी "

" तुझ्यासाठी ? " त्याला नवल वाटले

" होय माझ्यासाठी. लहानपण सारे दांडपट्ट्यांनी खेळण्यात घालवले. आजवर खेळ खेळले. आता खराखुरा पोषाख चढवून तूमचा भाऊ होऊन राहीन पहा तर खरं "

ठाकोर कौतुकाने पहातच राहिला.

## ४

अंगावर पोषाख चढवून, कमरेला तलवारी बांधून हाती भाले नाचवीत दोघे रजपूत वीर घोड्यावर बसून कोणा राजामहाराजाच्या पदरी नोकरीच्या शोधात निघाले. राजवाचा वेष इतका बेमालूम वठला होता कीं विधात्यालाही कोडे पडले असावे ' मी नर घडवला होता की नारी ? '

राजधानीच्या वेशीपाशी पोचतात तो बादशहा सलामत समोरून स्वारी घेऊन निघालेले. हे दोन शूरवीर पाहून खाशा स्वारीला मोठे कौतुक वाटले. त्यांना हुजऱ्याकरवी बोलावून घेऊन विचारले, " कोण आहांत "

" रजपूत. " त्यांनी मुजरा करून सांगितलें.

" कोठे निघालात ? "

" शेर बाजरीच्या शोधात अन्नदाता ! "

" आमच्या पदरी रहाल ? "

दोघांनी माना डोलावल्या.

" दोघांचे काही नाते ? "

"आते मामे माऊ सरकार."

दोघे रजपूत वीर बादशाहच्या चाकरीस लागले.

## ५

बादशहांची खाशी स्वारी शिकारीसाठी गेली होती. वख्त मोठा बांका गुदरला. शाही अंबारीवर जखमी झालेल्या वाघाने झेप घेतली तेव्हा परवरदिगारांच्या जिवावरच बेतले होते. बेहिस्ताचा दरवाजा उघडण्याच्या बेतात होता. आजूबाजूचे हत्यारबंद पन्नास रक्षक निरुपाय झाल्यासारखे जागच्या जागी खिळून उभे होते. त्याच निर्वाणीच्या क्षणी एक भाला कोठूनसा सणसणत आला आणि वाघाच्या जबड्याचा वेध घेऊन गेला. कोणाची होती ही बिनचूक फेक ? कोणी वांचवले धन्याचे प्राण ? तपास करता कळले की नव्या रजपूत वीरापैकी एकाचे काम होते ते.

राजबाने अवधान राखून नेम धरला होता.

त्या दिवसापासून नव्या स्वारांच्यावर वहाल मर्जी झाली. शाही शयनागारावरची चौकी मोठ्या विश्वासाने त्यांच्यावर सोपवली. रात्रीचा दिवस करून पहारा भरता भरता एक वर्ष सरले. पण अजूनही सावकाराला देण्यासाठी हजाराचा आकडा पुरा जमत नव्हता !

आषाढाची रात्र होती. पाण्याने ओथंबलेले ढग धरणीवर झुकत होते. वर्षभराने त्यांचा वियोग सरत होता. डोळ्यातून आनंदाच्या भरात सांडावे तसे टप् टप् थेंब पडत होते. मध्यरात्रीचे ते मूक मधुर मीलन पहाण्यासाठी खट्याळ चांदणे मधेच ढगांच्या कनातीतून डोकावत होते. त्याच्या मिस्किल डोळ्यात हसू मावत नव्हते. रातकिड्यांच्या घुमणाऱ्या तानेने मेघांच्या काळ्या निळ्या डोळ्यात झोप भरूं लागली होती. गाढ मिठीतून तृप्तीचा हुंकार उठावा तशी वीज कडकडून लखलखली.

निसर्गाचा हा सारा खेळ शाही चौकीवर बसून जागत्या डोळ्यानी पाहतांना त्या रजपूत वीरांची दशा काय झाली असेल बरे ! खांबाला टेकून उभे राहिल्या राहिल्या ठाकोराने आपले डोळे मिटून घेतले. राजबा मात्र गस्त घालीत होती. तिचे डोळे आकाशाकडे लागले होते. ती मनातल्या मनात

दिवसांची मोजदाद करीत होती. गेल्या ज्येष्ठात लग्न झाले. या आषाढात नोकरीला लागूनही वर्ष झाले. अशा या आषाढाच्या बरसत्या रात्री असा जीवघेणा वियोग माझ्याखेरीज कोणाच्याही नशिबी नसेल ! माझा कंथ हा माझ्यासमोरच उभा आहे. तरीही शेकडो योजनांची खाई मधे पडली आहे.

ढगांचा गडगडाट झाला. वाघाच्या गर्जनेलाही न भिणारी राजवा त्या आवाजाला मात्र भ्याली ! वाटले धावत जाऊन धन्याला मिठी घालावी. त्याच्या कुशीत लपून त्याच्या मायेच्या उबेत गाढ झोपून जावे. ती जवळ गेली—अगदी जवळ—एक तसूभर अंतर उरले. आणि त्या सावकाराने जणूं तिला मागे खेचले. सारे जग तिला धिक्कारीत जसे समोर उभे ठाकले ! आणि खांबाला टेकून घडीभर उभ्या उभ्याच मिटल्या डोळयांनी विश्रांती घेणारा तिचा कंथ किती उमदे होते त्याचे रुपडे ! विरहाच्या वेदना त्या मोहक रूपातूनही विव्हळत होत्या.

राजबा एकेका पावलाने मागे सरू लागली. डोळयात आपल्या पतीचे रूप साठवीत ती रूपवती मागे सरत होती. प्रत्येक पाऊल जमिनीवर खिळत होते. ते मोठ्या कष्टाने ती उचलीत होती. आजवर धरलेला धीर, नसानसातून खेळणारे धाडसी शौर्य सारे सारे जाणू छाती फाडून बाहेर पडले आणि एकाच उमाळयाने एका निःश्वासात समावून धवकन् जमिनीवर कोसळले ! किती जड जड होता तो निःश्वास !

कठड्यावर कोपर टेकवून, आपल्या लाल गुलाबी तळव्यांच्या ओंजळीत फुलल्या मोगऱ्यासारखे फिक्के पडलेले सुंदर मुख ठेऊन रजपुताणी क्षणभर उभी राहिली. भरल्या ढगात दडलेला पपैया ‘ पियु ’ ‘ पियु ’ ची आर्त साद घालीत होता. कसला उखाणा घालीत भिरभिरत होते ते पाखरू ?

राजबाने तो पारखीत एक दुहा म्हटला—

‘ देश विजां, पियु परदेशां, पियु बंधवारे वेश,
जे दीं जाशां देशमें ( तेदीं ) बांधव पियु करेश ’

( आज या परक्या परदेशात प्रियतम पण परदेशी झाला आहे. माझ्या बांधवाच्या वेशातल्या प्रियतमाला स्वदेशी परतल्याखेरीज प्रियतम म्हणायची देखील चोरी आहे. )

दिवस उजाडला आणि मनात न मावणारे गुपित बेगमेने बादशहाला सांगितले,

" आपल्या या नवीन चौकीदारांच्यात कांहीतरी गौप्य, रहस्य लपलेले आहे हं "

" असं ? मग या क्षणीच समशेरीने. . . . . ."

" अंहं–तुकडे करायची जरूर नाही, सांधायचीच आहे. त्यांच्यातली एक कोणीतरी नक्कीच स्त्री आहे. आणि कोठल्यातरी कारणाने त्यांना असे दूर रहावे लागते आहे "

" छट् काहींतरीच ! "

" मग करावी परीक्षा, म्हणजे कळेल "

" पण तुम्हाला कसा शक आला ? "

" काल मध्यरात्री एकाएकी माझी झोप उडाली आणि बाहेरून कोणीतरी खोल खोल लपलेल्या दुःखाने जळणारा उसासा टाकलेला कानावर आला, आणि त्या मागून ते दुःखही एका दोह्याच्या शब्दातून झिरपत कानावर येऊन पडले. हे असे शब्द केवळ स्त्रीच्याच तोंडून निघण्याची शक्यता आहे"

" पण मग आता या दोघांच्यातली स्त्री कोण हे कसे ओळखणार आपण ?"

" सांगते ना. आपण दोघांना बोलावून घ्यावे. बाजूला दूध तापत ठेवावे आणि ते उतूं जाऊं द्यावे. बाईची जात दूध उतास जातांना पाहून आकुळ व्याकुळ झाल्याखेरीज रहायची नाही. आम्हा बायकांचा जीवच असा ! "

आणि खरोखरीच बेगमच्या सांगण्या प्रमाणेच घडले. दूध उतास जातांना पाहून राजबा आपले उसने पुरुषपण विसरून ओरडली " दूध गेलं. . . ."

रजपुताने हळूंच कोपरखळी मारून म्हटले,

" जाईना ! आपल्या बापाच तर नाही गलं ! "

पण बादशहाचें काम झाले होते. स्त्रीला त्याने ओळखून काढले होते. तो दोघांना घेऊन बेगमेच्या महालात गेला. बेगमेने राजबाला जवळ बोलावून प्रेमाने विचारले,

"बोल बेटा. कोण आहात तुम्ही दोघं? खरं ते सांग. अभय वचन वचन आहे आमचं"

रजपुताणीचे गाल लाजेने लाल झाले. मान खाली घालून ती एका खांबाआड जाऊन उभी राहीली.

भरल्या अवाजाने रजपुताने आपली कर्मकहाणी सांगितली.

"अरे वा रे रजपूत बच्चा वा!" बादशहाने कौतुकाने पाठ थोपटून त्याला अश्वासन दिले,

"तुम्ही माझ्या फरजंदासारखी आहात दोघंजणं. आज, अभी तुमच्या त्या सावकाराकडे सव्याज रक्कम पोंचवून देतो आणि तुमचा संसार मांडून देतो."

बेगमेने आपल्या ठेवणीतला रजपुताणीचा किमती साजशृंगार स्वत: राजवाच्या अंगावर चढवला.

दोघेही भरल्या डोळयाने बादशहा व बेगम दोघांच्या पाया पडली. आणि त्यांना विनवले.

"अन्नदाता! तुम्हीच आमचे मायबाप. पण सावकाराच्या हातावर स्वत: जाऊन रक्कम ठेवून तो दस्तऐवज त्याच्याच हाताने उभा फाडून घेतल्याशिवाय आमचं व्रत पुरं नाही व्हायचं."

बादशाहने त्या दोघांना गाडीभर बक्षिसे देऊन त्यांची पाठवणी केली. सावकाराचे देणं फेडून, जमीन जहागिर सोडवून त्या रजपूत बच्चांनी आपली सोहागरात साजरी केली. *

---

* [ मि. किंकेड यांनी याच आशयाची एक कथा सिंधची लोककथा म्हणून दिली आहे. 'राजवीर-कथा' नावाच्या एका जुन्या पुस्तकात कथानायक उमरकोटचा सोढा, सावकार जेसलमिरचा बनिया व आश्रय देणारा उदेपूरचा राणा असे निरुपण केलेले आहे. काहींच्या मते ही मारवाडमधील कथा आहे तर काहींचे म्हणणे ही सौराष्ट्रातीलच आहे. नक्की काहीच सांगता येत नाही. ]

( सौराष्ट्रनी रसधार भाग ४ पृ. ७५-८५ पुनर्मुद्रण १९६२ )

## यौवनाचे मनोराज्य

कुडीत घोडयाचा थनगनाट, आत्म्याचे पंख फडफडतात
न बघितल्या भूमीवर, यौवन लावते टक
त्याच भूमीच्या काठावरती
जगातल्या युवकांचे डोळे लागती
अजाणत्या रस्त्यावर प्राणांचे घोडे दौडती
गरूड पंखांनी आत्मे उंच भरारी घेती
केशरी वेश चढवून यौवन समरांगणी निघाले
त्याला अडवतंय् कोण ? कोणाचे डोळे भरले ?
नका. प्रियजनांनो ! आसवे ढाळू नका
रणी जाणाऱ्यांना अपशकुन करूं नका
मत्त यौवनाचा शोध उगा घेऊं नका
काकुळतीने, रडत भेकत पाया पडता पडता
लाथा खाण्याचे दिवस, गेले निघून आता
लाचारीचे दिवस आता संपले
ताठ मानेने युवकाचे दल उभे ठाकले
दयेची भीक आता मागणे कशाला ?
विश्व समरांगणी युवा दिन उगवला
न पाहिलेले पहाण्यासाठी, अतळाचा तळ गाठण्यासाठी
असीम सत्य शोधण्यासाठी, यौवन मांडते ठाण
सीमा रेखा पुसावी, न देखले देखावे
सागराचा ठाव घेऊन त्याचे तळ शोधावे
दिगंतरी घुमत घुमत सुळावर पहुडावे
यौवनाचे हेच कोड, असेच आता जगावे

## निरोप

आमचीही होती घरकुले, प्रियजन अन् भावंडेही
पित्याचे समर्थ छत्र आणि मायेची होती कुशीही
निर्व्याज बहिणीच्या बोलक्या डोळयातला हलता हिंदोळा

त्यावर विसावावा थकला भागला ऊन ऊन डोळा
या साऱ्या ममतेची चक्की पिसताना वर्षामागून वर्षे गेली
फुलांच्या काळजांना अंगाराची आग लागली
धपापले श्वास टाकतांना झाले तुकडे छातीचे
रोमरोमातून फुटले होते ओघळ रक्ताचे
प्रियेला क्षणभर कवळून घ्यायला नव्हता वेळ
गोंजारल्या शिवायच सोडून आलो लहानगा बाळ
शेवटचे सांगायचे आईला ते राहूनच गेले
' वहाणारी आसवे हीच आता तुझी बाळे '
आहाहा ! किती तरी वेळ पाठ नाहीं सोडली
मातीची माया हाक घालीत राहिली
गळ्यात घालून हात, टेकवून ओठ आमच्या गाली
' फिराना परत ' व्यर्थ विनवीत राहिली
बिरादर नवजवान ! आमच्या मार्गापासून रहा दूर
' त्यांचा रस्ताच चुकला ' असे म्हण हवे तर
कधीं काही वाटलेच तर ' नादान ' म्हणून सोडून दे
पण ' बिचारे ' मात्र म्हणूं नको लाख वेळा कर धिक्कार
दोस्तांनो ! दिवाण्या बांधवांना झाले गेले माफ करा
आशिकांना सबूरी कशी ती कळते कां कधी यार ?
अंतरीच्या अंतरीची आग कोणाला दाखवावी ?
आमच्या वेड्या वेडाची तरी आठवण तुम्ही ठेवावी
विसरलात तर विसरून जा आमची फना कुर्बानी
कशाला जळत्या आठवणी ! सुखी तुमची जिनगानी
मात्र स्वातंत्र्य मिळेल त्याक्षणी कराल एक महेरबानी ?
पळभर आम्हाला स्मराल, त्या धन्य घडीच्या धन्य क्षणीं ?

## शेवटचा घोट

(गांधीजी गोलमेज परिषदेसाठी केवळ अपयश घेण्यासाठीच गेले तेंव्हा)

विषाचा हा शेवटचा पेला पिऊन घ्या बापू !
सागर पिणाऱ्याला एका घोटाची काय तमा बापू !

अथांग विश्वासाने तुमचे जीवन भरले आहे
आतां धूर्त दगलबाजांशीच तर गाठ आहे
शत्रूच्याही मांडीवर तुमचे मन निःशंक आहे
या अखेरच्या शय्येवर डोके आपले टेकवा बापू
शीर तुटले तरी रिपूमन एकदां मापून घ्या बापू !
सुरासुरांच्या मंथनातून होते निघाले,
पण रत्नांनी दिपलेल्यांना नव्हते दिसले
हलाहल ते शंभो, कोण घेईल दुसरे ?
अंतराला मिडणारा तो घोट घ्यायला झटकन जा बापू !
हे सौम्य–रुद्र. कराल–कोमल ! जा जा बापू !
जग म्हणेल ' काय, योग्याचे योगसाधन भंगले ?
सागर आटला ? कीं मेघांचे पाणी खुंटले ?
अथवा आकाशातल्या चंद्रसूर्याचे तेज विझले ?
आमच्या दुःखासाठी माघारी पाहू नका बापू !
आम्ही सहन केले नी करीतही राहू बापू !
आसूड, जप्ती, लाठ्या काठ्यांचा मार
जिवंत कब्रस्तानासारखे ते कारागार
सारे आता अंगवळणी पडले आहे बापू !
निर्माल्यातून तुम्ही पोलाद घडवले आहे बापू !
गेल्यासारखे काही आणलेत तरी वहाव्वा
रिकाम्या हाती परत आलात तरी वहाव्वा
आमच्या मिठीत असेल सारखाच प्रेमाचा ओलावा
पण जगाला एकदा भेट देऊन या बापू
आमच्या वेदनांना वाचा फोडून या बापू
एरवी जग देईल ठपका हाच का तो आत्मज्ञानी ?
स्वतःचे उणे लपवण्यासाठी कच खाणारा मिथ्यामानी
कसला आलाय विश्वप्रेमी ! मानवी व्यथाही न जाणी ?
आणि तुम्ही गेला, नाहीत तर दलित होतील कष्टी बापू !
तुमच्या एका सांत्वनांची त्यांना आस आहे बापू !
जा माय बाप ! माजल्या पोळाला वेसण घालायला
क्रूर हत्याकांडावर प्रेमाचे चार शिंतोडे टाकायला
सात सागरांना जोडणारा सेतू बांधायला

घनघोर वनांतरीच्या वाटा तूं उजळीत जा.
विक्राळ श्वापदांनां तूं गोंजारीत जा.
प्रभूचाच हा संकेत आहे वापू !
शेवटचा जहरी प्याला पिऊन या वापू !

## शेवटची प्रार्थना

युगानु युगे आमच्या वेदना कण्हत आहेत
काळीज कापणाऱ्या भयकथा थरथरत आहेत.
मेल्या जिवांचे रुधिर आणि जित्यांची आसवे
हे प्रभो ! सारे तुझ्याच पायी अर्पण असावे.
आमच्या यज्ञाचा हा अंतिम वली–' आमीन.'
' हरपलेले स्वातंत्र्य द्या ' हेच हवे आता वरदान.
अन्य हवि हवा असेल तर मागून घ्या देवा.
अंतिम संग्रामात पाठीशी तुमचा आधार हवा
प्रभो ! आता हे शेवटचेच युद्ध
सावधान करा जर हेतू असला अशुद्ध
आसवांनी भिजलेले, रक्ताने न्हालेले
आशीर्वाद मागत आहे सैन्य उभे ठाकलेले.
मार्गात कोठल्या विपत्ती वाट पहात आहेत ?
माहीत नाही आम्ही एकच जाणून आहोत.
मातेची हाक ऐकून मरायला सिद्ध झालो आहोत.
आईच्या चिरजीवनासाठी शिर हाती घेत आहोत.
तूं पाठीशी असताना मनाने निश्चिंत आहोत.
हे पिता ! अंतरें उघडी आहेत तुझ्यासमोर
एकेका जखमेतून वहाते आहे रक्ताची धार
अन्यायाचा जळतो आहे अन् मुका अंगार
सारेच वाहिले आहे आता तुझ्या पायावर
असूं दे काळी रात. आहेना तुझ्या हाती दिवा
वाळवंटी शेवट आमचा. पाज शेवटचा घोट देवा !
रणांगणी ऐकवा भीषण रणभेरीचा शब्द
अन् मरता मरता ऐकू आम्ही गोड वेणूनाद

कोसळतो आहे गगनचुंबी आशेचा मनोरा
हजारो भयांची भुतावळ करते आहे हुंकारा
तरीही अखंडच राहील समर्पणाची धारा
जननी जन्मभूला मिळेतो मुक्तीचा किनारा.

* * *

# पुढे चला चला

पुढे चला ! चला चला ! पुढे चला
गड्यांनो विनाश पथावरी पुढे चला
मागे आता वाट कुठे पुढेचि जायचे
थांबाल जरा तरी फटकेची बसायचे
नको रडे. मस्तीत गात गात जायचे
पुढे चला ! पुढे चला ! पुढेच जायचे.
बसायचे ? कोण बसूं देतो तुम्हाला ?
हर घडी तोंड फुटतेय् नव्या युद्धाला
कशी मिळेल आरामाने पाठ टेकायला !
पुढे चला ! पुढे चला ! पुढे चला चला
पुढे चला सागराच्या उसळत्या पटावरी
निर्जल वाळवंटी, गर्द गाढ वनांतरी
डोंगर माथ्यावरी, ऊन वारा वा पाऊस सरी
पुढे चला ! चला चला ! पुढेच जायचे.
रस्ता उरला अन शिदोरी सरली
शोष पडला नी शक्ती संपली
तरी देखील हताश होऊनी काय साधेल ?
पुढे चला ! चला चला ! पुढेच जायचे.
साथी सांगाती संगे येवोत वा न येवोत
धिक्कार, बदनामी, वाईटपणात
वैऱ्यांच्या वैराशी झुंझत झुंझत
पुढे चला ! चला चला ! पुढे चला
उभे रहाल ? कुठे ? पायाखाली जळते
वरच्या थंड भूमीखाली लाव्हा उकळते
जळत्या अंगारावर फुले का कोणी टाकते ?

पुढ चला ! चला चला ! पुढेच जायचे
पापांची भरतें आहे घडी ही अखेर
भरेल पुरी. आता वेळ नाही फार
यातनांचा अंत आपल्या आहे समोर
पुढे चला. चला चला. पुढेच जायचे.
ज्वालामुखीच्या मुखावर जीवन–
यात्रा चालली तुझी नवजवान !
मुक्ति कदंबावर माता घेईल उंच झोका
पुढे चला. चला चला. पुढे चला !
गड्यांनो ! विनाश पथावरी तुम्ही पुढे चला.

* * *

# संदर्भ ग्रंथ-सूचि

**पुस्तके**


१) भट्ट व्ही. अेम्. – निकष रेखा
२) ब्रह्मभट्ट अनिरुद्ध – झवेरचंद मेघाणी
३) जोशी जयंत – मेघाणी स्मृतिओ
४) जोशी जयंत – झवेरचंद मेघाणी–व्यक्तित्व अने वाङ्मय
५) जोशी डॉ. उमाशंकर – मेघाणी स्मृतिग्रंथ
६) मेघाणी महेन्द्र – लि. स्नेहाधीन झवेरचंद (मेघाणीना पत्रो)
७) ठक्कर डॉ. धीरुभाई – गुजराती साहित्यनी विकास रेखा (भाग २ : अर्वाचीन कला)


**लेख**


जानी कनुभाई – कुसुंबल रंग (कुमार मासिकातील लेख)


* * *


Indian ... Advanced ...
117027
9/12/04
SHIMLA

साहित्य अकादेमी ही भारत सरकार द्वारा १९५४ मध्ये स्थापन झालेली ' नॅशनल अकॅडमी ऑफ लेटर्स ' आहे. ही एक स्वायत्त संस्था असून तिचे धोरण एका परिषदेद्वारा निर्णित होते. या परिषदेत विभिन्न भारतीय भाषा, राज्य व विद्यापीठे यांचे प्रतिनिधी असतात.

अकादेमीचा कार्यक्रम भारतीय भाषांतील साहित्यिक उपक्रमांचा समन्वय करणे व त्यांची वाढ करणे हा होय. एका भारतीय भाषेतील साहित्याचे लोण अनुवादाद्वारा अन्य–भाषांच्या वाचकांपर्यंत पोचविणे हे तिचे उदिष्ट आहे.

अकादेमीचे प्रकाशन मुख्यतः भारतीय भाषांतून होत असते. इंग्रजी प्रकाशनाचा हेतू सामान्यतः भारतीय लेखन व त्याच्या कृती याबद्दल आवश्यक परिचय देण्यापुरता मर्यादित आहे.